


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २७० ■ गुरूवार, दि. ९ एप्रिल २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

## भोंदूबाबा अशोक खरातला ५ दिवसांची कोठडी

**नाशिक:** नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात याला नाशिक सत्र न्यायालयाने आज ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. न्यायाधीश श्रीमती बी. एन. इचपुराणी यांच्या न्यायालयात आजची सुनावणी झाली. या सुनावणीसाठी आरोपी अशोक खरात व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थित होता. अशोक खरातला न्यायालयाने तिसऱ्या गुन्ह्यात ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. यापूर्वी दुसऱ्या गुन्ह्यातील ७ दिवसांची पोलीस कोठडी संपल्यानंतर आज त्याला न्यायालयात हजर करण्यात आले होते. यावेळी सरकारी वकिलांकडून ७ दिवसांची पोलीस कोठडी द्यावी, असा युक्तिवाद करण्यात आला. यावर आरोपीच्या वकीलांनी विरोध केला. आरोपीचा एसआयटी तपास करत आहे.

# शरद पवारांचा काँग्रेसला सल्ला....
# बारामतीची निवडणूक बिनविरोध व्हावी



प्रतिनिधी ९ एप्रिल

**पुणे:** बारामती विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणूक सध्या राज्याच्या राजकारणाचा केंद्रबिंदू ठरली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे ही जागा रिक्त झाल्यानंतर निवडणूक बिनविरोध व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. याच पार्श्वभूमीवर ज्येष्ठ नेते शरद पवार यांनीही काँग्रेसला निवडणूक बिनविरोध करण्याचा सल्ला देणार असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे या निवडणुकीकडे केवळ राजकीय नव्हे, तर भावनिक दृष्टिकोनातूनही पाहिले जात आहे.दरम्यान, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी शरद पवार यांना सल्ला देण्याचा अधिकार असल्याचे मान्य केले. मात्र, या विषयावर अंतिम निर्णय काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करूनच घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे काँग्रेसने अजून अंतिम भूमिका जाहीर केलेली नसली तरी पक्षामध्ये विचारमंथन सुरू असल्याचे संकेत मिळत आहेत.काँग्रेस हा राष्ट्रीय पक्ष असल्यामुळे त्यांना निर्णय घेण्याचा पूर्ण अधिकार आहे, असे स्पष्ट करत शरद पवार यांनी थेट हस्तक्षेप न करता आपली भूमिका मांडली. मात्र, ही जागा अपघाताने रिक्त झाली असल्याने महाराष्ट्राने एक कर्तृत्ववान प्रतिनिधी गमावला आहे.

### आता ४७ उमेदवार रिंगणात शिल्लक

दरम्यान, बारामती पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस जवळ आला असून, काँग्रेसने माघार न घेण्याची ठाम भूमिका घेतल्यामुळे निवडणूक होण्याची शक्यता जवळपास निश्चित झाली आहे. या पार्श्वभूमीवर आज बारामतीत सहा उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले आहेत. सुरुवातीला वैध ठरलेल्या ५३ अर्जांपैकी आता ४७ उमेदवार रिंगणात शिल्लक राहिले आहेत. मात्र अंतिम आकडेवारी सायंकाळनंतर स्पष्ट होणार असून, शेवटच्या दिवशी आणखी घडामोडी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## बारामतीत काँग्रेस ठाम, शेवटच्या दिवसाकडे सर्वांचे लक्ष



बारामतीतील अर्ज मागे घेण्याबाबत अंतिम निर्णय आम्ही पक्षातील वरिष्ठांशी चर्चा करूनच घेऊ. भाजप फोन करेल असं वाटतं नाही आणि तशी अपेक्षाही नाही. कोणालाही अडथळा आणण्यासाठी आम्ही मैदानात उतरत नाही, वैचारिक पातळीवर लढणं ही आमची भूमिका आहे.

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रोहित पवार यांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची भेट घेत बंद दाराआड चर्चा केली. या भेटीत काँग्रेसने बारामतीतून उमेदवारी मागे घ्यावी, यासाठी संवाद झाल्याची माहिती समोर येत आहे. मात्र, काँग्रेसने आकाश मोरे यांना उमेदवारी जाहीर करून निवडणूक लढवण्याचा निर्धार आधीच स्पष्ट केला आहे. या चर्चेदरम्यान रोहित पवार यांनी पार्थ पवार यांच्या वक्तव्यामुळे निर्माण झालेल्या नाराजीबाबत दिलगिरी व्यक्त केल्याचेही सांगितले. पार्थ पवारांच्या वक्तव्यामुळे काँग्रेसमध्ये काही प्रमाणात असंतोष निर्माण झाला होता. तसेच, अजितदादांना न्याय द्या, असा संदेश काँग्रेसकडून देण्यात आल्याचेही समजते. या भेटीत रोहित पवार यांचा काँग्रेसचे प्रभारी नेते चेन्नीथला यांच्यासोबतही संवाद झाला, ज्यामुळे या चर्चेला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी, याच पार्श्वभूमीवर रोहित पवार यांनी सपकाळ यांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी काँग्रेसने बारामतीतून माघार घ्यावी, अशी विनंती केली. विशेष म्हणजे या चर्चेदरम्यान त्यांनी व्हिडीओ कॉलद्वारे काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्याशीही संवाद साधला. बंद दाराआड झालेल्या या बैठकीत रोहित पवार यांनी अजितदादांसारखा मोठा नेता गेल्यानंतर या निवडणुकीकडे भावनिक दृष्टिकोनातून पाहायला हवे, असे मत मांडले.दरम्यान, काँग्रेसने मात्र आपली भूमिका स्पष्ट केली आहे. अजित पवार प्रकरणात योग्य ती कारवाई आणि तपास व्हायला हवा, असा मुद्दा काँग्रेसकडून मांडण्यात आला आहे. एवढा मोठा नेता गेल्यानंतर जर योग्य तपास होत नसेल, तर सामान्य नागरिकांना न्याय कसा मिळणार? असा सवाल काँग्रेसने उपस्थित केला आहे. त्यामुळेच त्यांनी आकाश मोरे यांना उमेदवारी दिल्याचे रोहित पवार यांनी सांगितले.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा सपकाळांना फोन



प्रतिनिधी ९ एप्रिल

**मुंबई:** बारामती विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या राजकारणात मोठी आणि अनपेक्षित घडामोड घडली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांना थेट फोन करून बारामतीतील निवडणुकीबाबत चर्चा केल्याची माहिती समोर आली आहे. या संवादामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, आगामी निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.बारामतीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार रिंगणात असताना ही निवडणूक बिनविरोध व्हावी, यासाठी महायुतीकडून प्रयत्न सुरू आहेत. मात्र काँग्रेसने सुरुवातीपासूनच माघार न घेण्याची भूमिका घेतल्याने लढत अटळ मानली जात होती. अशा परिस्थितीत फडणवीसांनी थेट काँग्रेस नेतृत्वाशी संपर्क साधल्यामुळे राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, सुनेत्रा पवार यांच्या बिनविरोध निवडीसाठी काँग्रेसने आपला उमेदवार मागे घ्यावा, अशी विनंती फडणवीसांनी केली.राज्यातील सत्ताधारी पक्षाचा प्रमुख नेता विरोधी पक्षाच्या प्रदेशाध्यक्षांना थेट फोन करून निवडणुकीसंदर्भात चर्चा करणे, ही दुर्मीळ बाब मानली जात आहे. त्यामुळे या घटनेला राज्याच्या राजकारणातील अचंबित करणारा क्षण मानले जात आहे. फडणवीसांच्या या फोननंतर काँग्रेसची भूमिका बदलते का, याबाबत आता मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनीही या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसच्या दिल्लीतील वरिष्ठ नेत्यांशी चर्चा केल्याची माहिती आहे. उमेदवारी मागे घेण्याच्या विषयावर काँग्रेसमध्ये विचार सुरू असल्याचे संकेत मिळत आहेत. त्यामुळे बारामतीतील राजकीय घडामोडींना अधिक वेग आला आहे. याआधी सुनेत्रा पवार आणि राष्ट्रवादीच्या काही नेत्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतली होती. त्या भेटीत त्यांनी संपूर्ण पाठिंबा देण्याचा शब्द दिल्याची माहिती आहे. त्यानंतर लगेचच काँग्रेसशी संपर्क साधल्याने या हालचालींना अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. राष्ट्रवादी चे एक शिष्टमंडळ सपकाळांच्या भेटीला गेल्याचे चित्र आज दूपारी होते.

### शरद पवारांचा मल्लिकार्जुन खरगेंना फोन

काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्यासोबत शरद पवारांची चर्चा झाल्यानंतर बारामतीमधे आपला उमेदवार मागे घेत असल्याचं खर्गे यांचं शरद पवारांना आश्वासन दिल्याची माहिती आहे. एक तासापूर्वी दोघांतील चर्चेनंतर निर्णय झाल्याची विश्वसनीय सूत्रांची माहिती आहे. एक तासापुर्वी दोन्ही बड्या नेत्यांमध्ये चर्चा झाली, त्यानंतर आता काँग्रेसने या निवडणुकीतून माघार घेणार असल्याचं आश्वासन दिलं असल्याची माहिती समोर आली आहे. तर याबाबतची माहिती काही वेळात प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ याबाबतची घोषणा करतील तर दुपारी २ वाजण्याच्या सुमारास त्यांचा उमेदवार अर्ज माघारी घेईल अशी माहिती आहे.



राष्ट्रवादी काँग्रेस पार्थ अजितदादा पवार यांनी राज्यसभेच्या सदस्यत्वाची शपथ घेत लोकसेवेच्या नव्या पर्वाची सुरुवात केली. देशाचे उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी त्यांना खासदारकीची शपथ दिली.

## भीषण अपघातात केजचे तहसीलदार राकेश गिड्डे यांचा मृत्यू

प्रतिनिधी ९ एप्रिल

**बीड:** केज तालुक्याचे तहसीलदार राकेश गिड्डे यांचा गुरुवारी पहाटे झालेल्या भीषण अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. लातूर-अंबाजोगाई महामार्गावरील रेणापूर फाट्याजवळ ही दुर्घटना घडली. एका कर्तव्यदक्ष आणि तरुण अधिकाऱ्याचा अशा प्रकारे अचानक मृत्यू झाल्याने बीड जिल्ह्यात शोककळा पसरली आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, राकेश गिड्डे हे स्वतःच्या कारने प्रवास करत होते. पहाटे सुमारे पाच वाजण्याच्या सुमारास त्यांची गाडी वेगात असताना अचानक नियंत्रण सुटले. त्यानंतर कार रस्त्याच्या खाली घसरून पलटी झाली. अपघाताची तीव्रता इतकी होती की, त्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. रेणापूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अपघाताच्या वेळी गाडीत ते एकटेच होते.

# युद्ध विराम होताच सोन्याचे दर घसरले !

प्रतिनिधी ९ एप्रिल

**पुणे :** सोने-चांदीच्या दरात पुन्हा एकदा घसरण झाल्याचं पाहायला मिळत आहे. अमेरिका इस्त्रायल आणि इराण देशात जाहीर करण्यात आलेल्या युद्ध विरामानंतर काल (बुधवारी, ता ८) सोन्याच्या आणि चांदीच्या दरात मोठी वाढ झाल्याचं पाहायला मिळत असताना आज पुन्हा सोने चांदीच्या दरामध्ये घसरण झाल्याचं पाहायला मिळत आहे. काल (बुधवारी, ता ८) सोन्याचे दर जी एस टी शिवाय १५२००० वर पोहोचले होते, आज त्यात तीन हजार रुपयांची घसरण होऊन ते १४९००० वर खाली आले आहेत, चांदीच्या दरात ही सात हजार रुपयांची घसरण पाहायला मिळत आहे. काल (बुधवारी, ता ८) २४७००० वर असलेले चांदीचे दर आज २४०००० वर खाली आले आहे. एकाच दिवसात झालेल्या सोने चांदी दरातील घसरणीचे कारण मात्र कळू शकले नाही. देशांतर्गत फ्युचर मार्केटमध्ये गुरुवार, ९ एप्रिल रोजी सोने-चांदीच्या किमतीत घसरण पाहायला मिळत आहे. व्यवहाराच्या सुरुवातीलाच दोन्ही धातूंचे दर घसरले. बातमी लिहिली जात असताना मल्टी कमोडिटी एक्सचेंज (MCX) वर ५ जून २०२६ एक्सपायरी असलेला गोल्ड फ्युचर सुमारे ४२० रुपयांच्या घसरणीसह व्यवहार करत होता.

# महाबीज आता दिलीप स्वामी यांच्या हाती !

प्रतिनिधी ९ एप्रिल



**अकोला:** महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांची भाग्यरेखा समजल्या जाणाऱ्या 'महाबीज'ला अखेर पूर्णवेळ आणि अनुभवी नेतृत्व मिळाले आहे. राज्याच्या कृषी क्षेत्रात क्रांती घडवणाऱ्या महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाच्या (महाबीज) व्यवस्थापकीय संचालकपदी दिलीप स्वामी यांनी आज अधिकृतपणे पदभार स्वीकारला.अकोल्याच्या जिल्हाधिकारी तथा प्रभारी व्यवस्थापकीय संचालक श्रीमती वर्षा मीना यांच्याकडून स्वामी यांनी पदभाराची सूत्रे हाती घेतली. यावेळी महामंडळातील वरिष्ठ अधिकारी आणि प्रशासकीय मान्यवरांची उपस्थिती होती.

दिलीप स्वामी हे त्यांच्या धडाकेबाज कार्यशैलीसाठी ओळखले जातात. यापूर्वी छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी म्हणून त्यांनी प्रशासनात जी पारदर्शकता आणि गतीमानता आणली, त्याची चर्चा आजही संपूर्ण महसूल विभागात होते. जनतेशी थेट संवाद आणि फाईल्सचा जलद निपटारा ही त्यांची ओळख आता महाबीजच्या कामी येणार आहे.गेल्या काही काळापासून बियाणे पुरवठा आणि प्रशासकीय नियोजनावरून महाबीजसमोर अनेक आव्हाने उभी आहेत. मात्र, दिलीप स्वामी यांचा व्यापक अनुभव आणि दूरदृष्टी पाहता, महाबीजच्या कामकाजात आता मोठी 'ओव्हरहॉलिंग' होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

स्वामी यांच्या आगमनाने महामंडळातील निर्णयप्रक्रियेला वेग येईल. खरीप हंगामात शेतकऱ्यांना वेळेत आणि उच्च दर्जाचे बियाणे उपलब्ध करून देण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर असेल.महाबीजच्या विस्कळीत झालेल्या यंत्रणेला पुन्हा एकदा रुळावर आणण्यासाठी स्वामी काय 'मास्टर प्लॅन' आखतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. प्रशासनातील एक अनुभवी 'कॅप्टन' आता महाबीजच्या मैदानात उतरला असून, आगामी खरिपाच्या पार्श्वभूमीवर हा पदभार अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

# शिक्षकाची माणुसकी लाचार, विद्यार्थिनीवर केला अत्याचार !

प्रतिनिधी ९ एप्रिल

**केनवड :** शिक्षणाच्या पवित्र मंदिरातच मानवतेला काळिमा फासणारी संतापजनक घटना मेहकर तालुक्यातील लोणी गवळी येथे उघडकीस आली आहे. तिसऱ्या वर्गात शिकणाऱ्या चिमुकल्या विद्यार्थिनींशी एका शिक्षकाने अश्लील चाळे केल्याचा धक्कादायक प्रकार बुधवार, ७ एप्रिल २०२६ रोजी घडला असून या घटनेमुळे संपूर्ण परिसरात संतापाची लाट उसळली आहे. महादेव आत्माराम मानतोडे (वय ५८) असे आरोपी शिक्षकाचे नाव असून तो जिल्हा परिषद शाळेत कार्यरत होता.



विशेष म्हणजे हा शिक्षक वाशीम जिल्ह्यातील मानोरा तालुक्यातील रहिवासी असल्याची माहिती समोर येत आहे. निवृत्तीच्या उंबरठ्यावर असलेल्या या शिक्षकाने आपल्या वर्गातील तीन निष्पाप मुलींचा विनयभंग केल्याची माहिती समोर आली आहे.

मागील काही काळापासून तो मुलींवर अश्लील चाळे करत होता. एवढेच नव्हे, तर हा प्रकार कुणालाही सांगितल्यास शाळेतील खिचडीत विष टाकून जीव घेण्याच्या धमक्या देत होता. भीतीपोटी गप्प बसलेल्या मुलींनी अखेर ७ एप्रिल रोजी घडलेल्या प्रकारानंतर आपल्या पालकांना सर्व हकीकत सांगितली.

यानंतर संतप्त पालक व ग्रामस्थांनी ८ एप्रिल रोजी शाळेत धाव घेत आरोपी शिक्षकाला पकडून चांगलाच धडा शिकवला. काही काळ गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच डोणगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार अमरनाथ नागरे, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खाडे यांच्यासह पोलिसांचा ताफा घटनास्थळी दाखल झाला. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणत आरोपीला ताब्यात घेतले.या प्रकरणी डोणगाव पोलिसांनी पालकांच्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहिता कलम ७४, ७५, ७८, ३५२ तसेच बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा (पोक्सो) कलम ८ व १२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, या प्रकाराची माहिती एका विद्यार्थिनीच्या आजीला मिळाल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. तिच्या चौकशीत आणखी मुलींनीही शिक्षकाच्या विकृत कृत्यांची कबुली दिल्याने गावात संतापाची तीव्र प्रतिक्रिया उमटली. शिक्षण विभागानेही तत्काळ कारवाई करत गटशिक्षणाधिकारी यांच्या आदेशाने आरोपी शिक्षकाला निलंबित केले आहे.

### गाव संतप्त, न्यायाची मागणी तीव्र

या घटनेमुळे लोणी गवळी गावात संतापाचे वातावरण असून आरोपीवर कठोरात कठोर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. शिक्षणाच्या मंदिरातच अशा प्रकारची घटना घडल्याने पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



# शरीरातील व्हिटॅमिन बी12 ची कमतरता घातक !

*व्हिटॅमिन बी१२ हे शरीरातील लाल रक्तपेशी तयार करण्यासाठी आणि मज्जासंस्थेच्या योग्य कार्यासाठी अत्यंत महत्त्वाचे पोषक घटक आहे. शरीरात बी १२ ची कमतरता निर्माण झाल्यास थकवा, अशक्तपणा, हातपायांना मुंग्या येणे, विसरभोळेपणा यांसारखी लक्षणे दिसू लागतात. याचा परिणाम मेंदू, नस, हृदय आणि डोळ्यांवरही होऊ शकतो. योग्य वेळी रक्त तपासणी, डॉक्टरांचा सल्ला आणि संतुलित आहार घेतल्यास ही कमतरता भरून काढता येते. व्हेज नॉनव्हेजमध्ये अंडी, मासे, डेअरी पदार्थ आणि फोर्टिफाइड फूड्स हे बी १२ चे चांगले स्रोत मानले जातात.*



व्हिटॅमिन बी १२ हे शरीरातील लाल रक्तपेशी तयार करण्यासाठी आणि मज्जासंस्थेच्या कार्यासाठी खूप गरजेचे व्हिटॅमिन आहे. 'मेयो क्लिनिक' नुसार, शरीराला दररोज साधारण २.४ मायक्रोग्राम बी १२ ची गरज असते. 'हार्वर्ड हेल्थ' च्या संशोधनानुसार, जर रक्तातील व्हिटॅमिन ँ१२ ची पातळी कमी झाली, तर त्याचा परिणाम केवळ शरीरावरच नाही तर मानसिक आरोग्यावरही होतो. शरीरात हे व्हिटॅमिन लिव्हरमध्ये बनते व स्टोअर होते पण तरीही आहारात सातत्य नसल्यास याची कमतरता वेगाने जाणवू लागते. ही कमतरता वेळीच ओळखल्यास मज्जासंस्थेचे, नसांचे होणारे कायमस्वरूपी नुकसान टाळता येते.

### कमतरता कशी ओळखावी?

एनएचएसच्या अहवालानुसार, व्हिटॅमिन बी १२ च्या कमतरतेची लक्षणे सुरुवातीला सौम्य असतात, पण नंतर ती तीव्र होतात. थकवा आणि अशक्तपणा, हातापायांना मुंग्या येणे, जीभ लाल होणे किंवा तोंड येणे, विसरभोळेपणा, त्वचा पिवळसर होणे

### कोणते अवयव प्रभावित होतात?

मेंदू आणि मज्जासंस्था : बी १२ च्या अभावामुळे नसांवरील संरक्षक आवरण कमकुवत होते. यामुळे विसरभोळेपणा, नैराश्य आणि गंभीर स्थितीत 'डिमेंशिया' होऊ शकतो. हृदय : बी१२ कमी असल्यास रक्तातील होमोसिस्टीनची पातळी वाढते, ज्यामुळे हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका वाढतो. डोळे : ऑप्टिक नर्व्हवर परिणाम झाल्यामुळे डोळ्यांची दृष्टी धूसर होऊ शकते. पचनसंस्था : भूक न लागणे आणि बद्धकोष्ठतेसारख्या समस्या जाणवू लागतात.

### घरगुती उपाय आणि उपचार

रक्त तपासणी : सर्वात आधी व्हिटॅमीन बी १२ सिरम टेस्ट करून व्हिटॅमिन बी१२ शरीरात किती कमी झाले आहे याची पातळी तपासावी.

**पूरक आहार :** जर कमतरता जास्त असेल तर डॉक्टरांच्या सल्ल्याने ँ१२ च्या गोळ्या किंवा इंजेक्शन्स घेणे आवश्यक असते.

**स्वच्छता आणि व्यसनमुक्ती :** जास्त मद्यपान केल्याने शरीराला बी १२ शोषून घेण्यात अडथळा येतो, त्यामुळे व्यसन टाळावे.

### काय खावे

व्हिटॅमिन B12 हे प्रामुख्याने प्राण्यांपासून मिळणाऱ्या पदार्थांत असते, पण शाकाहारी लोकांसाठीही काही पर्याय आहेत.

**डेअरी उत्पादने :** दूध, दही, पनीर, लोणी आणि चीज हे B12 चे उत्तम स्रोत आहेत. रोज किमान २ ग्लास दूध प्यावे.

**अंडी आणि मांसाहार :** अंडी, मासे (उदा. साल्मन, रावस) आणि चिकनमध्ये हे मुबलक प्रमाणात असते.

**फोर्टिफाइड फूड्स :** काही प्रकारचे ओट्स, तृणधान्ये आणि सोया मिल्कमध्ये वरून व्हिटॅमिन ँ१२ मिसळलेले असते.

**आंबवलेले व मोड आलेले पदार्थ :** आहारात अंकुरित किंवा मोड आलेली कडधान्ये आणि आंबवलेले पदार्थ (उदा. इडली, डोसा) यांचा समावेश केल्यास पचन सुधारून बी१२ शोषण्यास मदत होते.

# वन पर्यटन : अंबाबरवा अभयारण्य, प्राण्यांचे माहेरघर; आज स्थापनेची २९ वर्षपूर्ती




**अकोला :** इंग्रजांच्या काळापासून अंबाबरवा थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध आहे. शासनाने ९ एप्रिल १९९७ च्या आदेशान्वये अंबाबरवा वनक्षेत्राला अभयारण्याचा दर्जा दिला. अंबाबरवा अभयारण्य बुलडाणा जिल्ह्याच्या उत्तर पूर्वेला सातपुड्याच्या कुशीत वसलेले आहे. अंब्याबरव्याला जाताना बदरारा, चिंचखाडी, पिंपळखेड अशी अनेक निर्सगरम्य ठिकाणे लागतात. सुंदर सूर्यास्त दिसतो. समुद्रसपाटी पासून हे ठिकाण उंचीवर आहे. १२७.११० चौरस किमी. डोंगरदऱ्यांनी व्यापलेले हे क्षेत्र संरक्षित झाल्याने येथील समृद्ध जैवविविधता जपली गेली. सातपुडाच्या जंगलात विविध वृक्षांच्या जाती आहेत. मोहा, सागवन, टेमरू, अंजन, पिंपळ, वड, आळी, बेल, कविट, चिंच, जांभूळ, आंबा, घामोडा, साल, निंब इत्यादी झाडे असून अनेक कंदमुळे आहेत. कनिहाकन्द, कुन्दरी विरी, बरहा, मिस्वकन्द, शंकरकन्द, रामकन्द, कलाकन्द जामिकन्द इ. त्याचप्रमाणे सातपुड्यात वाघ, हरीण, रानडूकर, सांबर, निलगाय, अस्वल, रोही हे प्राणी आहेत तर मोर, लांडोर, तितर, कबुतर, कोकिळा, पोपट मैना, पारवा, होलगी, इ. पक्षी जंगलात आहेत. अनेक वनौषधी उपलब्ध आहेत. भाविकांच्या दृष्टीनेही अंबाबरवा अभयारण्याचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे. महाराष्ट्रातील वनवैभवाचा आपण विचार करतो तेव्हा विदर्भाला अमाप वनसंपत्ती लाभली असल्याचे आपल्याला दिसून येते. अनेक वने, जंगले, प्राणी, पक्षी आणि खनिज संपत्तीने नटलेल्या, बहरलेल्या विदर्भावर निसर्गाने मुक्तहस्ताने उधळण केली आहे.



बुलढाणा जिल्हातील संग्रामपूर तालुका व अकोला जिल्ह्यातील काही भाग अंबाबरवा अभयारण्याचे क्षेत्र आहे. या जंगलात वाघ, बिबट, रानकुत्रा, तडस, अस्वल, कोल्हा, गवा, सांबर, भेडकी, ससा, उदमांजर हे प्राणी आहेत. मोर, हरोळी, नाचन, स्वर्गीय नर्तक, टकाचोर, पिंगळा, रातवा यांचासह २०० वर पक्षी असून फुलपाखरे व इतर किटकांसह येथील जैवविविधता समृद्ध आहे. त्याचा आनंद लुटण्यासाठी पर्यटक गर्दी करतात. मधला कोरोनाचा काळ सोडला तर आता पर्यटकांची पावले पुन्हा अभयारण्याकडे पडू लागली आहेत.

विदेशी पर्यटकांनाही भुरळ

बुलडाणा जिल्ह्याच्या सातपुडा पर्वतारांगांमध्ये वसलेल्या आदिवासी बहुल भागामधील अंबाबरवा अभयारण्याची भूरळ आता विदेशी पर्यटकांना सुद्धा पडते. हे अभयारण्य पाहण्यासाठी विदेशातून पर्यटक आता मोठ्या प्रमाणात गर्दी करतात. या अभयारण्यात असलेली जंगल सफारी पर्यटकांना आकर्षित करते. विविध भागातून पर्यटक येथे येत असतात.

# एफडी करत असाल तर बँकांचे लेटेस्ट व्याजदर तपासा

भारतीय रिझर्व्ह बँकेची एमपीसी बैठक आज संपन्न झाली. मध्यवर्ती बँकेने स्पष्ट केले आहे की रेपो दर ५.२५ टक्के वर अपरिवर्तित राहील. याचा अर्थ असा की, सध्या तरी तुमच्या गृहकर्ज किंवा वाहन कर्जाच्या व्याजदरात कोणताही बदल होणार नाही. शिवाय, बँकेच्या एफडी व्याजदर देखील सध्याच्या पातळीवरच राहतील.

आता रेपो दर ५.२५ टक्के वर स्थिर झाल्यामुळे, अनेक सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमधील एफडी दर आकर्षक राहिले आहेत. बाजारातील अनिश्चितता पाहता, तुमच्या बचतीचा काही भाग सुरक्षित पर्यायांमध्ये गुंतवणे हा एक शहाणपणाचा निर्णय असू शकतो.

जर तुम्ही तुमची बचत फक्त एका वर्षासाठी गुंतवण्याची योजना आखत असाल, तर सध्या कोणती बँक सर्वोत्तम परतावा देत आहे माहित असणं गरजेचे आहे. अलीकडील आकडेवारीनुसार, या अल्प कालावधीसाठी इंडियन ओव्हरसीज बँक आघाडीवर आहे. ही बँक एका वर्षाच्या एफडीवर ६.५० टक्के इतका प्रभावी व्याजदर देते, जो प्रमुख सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये सर्वाधिक आहे. युनियन बँक ऑफ इंडिया देखील मागे नाही, ती ६.३० टक्के इतका चांगला परतावा देत आहे. जर तुम्ही पंजाब अँड सिंध बँकेत गुंतवणूक करण्याचा विचार करत असाल, तर ती एक वर्षाच्या ठेवींवर फक्त ५.५८ टक्के इतका सर्वात कमी व्याजदर देते. देशातील सर्वात मोठी बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया, पंजाब नॅशनल बँक आणि कॅनरा बँक यांच्यासोबत एक वर्षाच्या मुदतीसाठी ६.२५ टक्के व्याजदर देत आहे. बँक ऑफ इंडिया आणि सेंट्रल बँक ऑफ इंडिया सारख्या संस्था देखील ६.२० ते ६.२५ टक्के दरम्यान दर देतात.

ज्यांना आपले भांडवल दीर्घ कालावधीसाठी सुरक्षित ठेवायचे आहे आणि भरीव एकरकमी परतावा मिळवायचा आहे, त्यांच्यासाठी ३ आणि ५ वर्षांच्या एफडी नेहमीच एक उत्तम पर्याय राहिल्या आहेत. तीन वर्षांच्या गुंतवणुकीच्या कालावधीसाठी, स्टेट बँक ऑफ इंडिया आणि पंजाब नॅशनल बँक ग्राहकांना सर्वात आकर्षक दर देतात, ज्यांचे दर ६:३० टक्क्यांपासून सुरू होतात. त्याउलट, बँक ऑफ महाराष्ट्र सर्वात कमी व्याजदर देते, तीन वर्षांच्या मुदतीसाठी फक्त ५.२५ टक्के आणि पाच वर्षांच्या मुदतीसाठी ५.०० टक्के.

जर तुम्ही पाच वर्षांसाठी गुंतवणूक करण्याचा विचार करत असाल, तर बँक ऑफ बडोदा हा सर्वात योग्य पर्याय असू शकतो. ही बँक या दीर्घ मुदतीसाठी ६:३० टक्के व्याजदर देते, जो इतर सर्व सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये सर्वोत्तम आहे. याव्यतिरिक्त, कॅनरा बँक पाच वर्षांच्या मुदतीसाठी ६.२५ टक्के स्थिर परतावा देते.

# महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना

आरोग्य सुविधेसाठी महाराष्ट्र सरकारकडून महात्मा फुले जन आरोग्य योजना राबविण्यात येते. ही एक कॅशलेस आरोग्य विमा योजना आहे. नागरिकांना असंख्य आजारांवर मोफत उपचार या योजनेमार्फत मिळत आहेत. योजना काय आहे आणि या योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे कोणती तसेच कव्हरेज किती यासंबंधी माहिती जाणून घेऊया...

महाराष्ट्र सरकारच्या सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे राबविण्यात येणारी एक महत्त्वाची योजना म्हणजे महात्मा फुले जन आरोग्य योजना आहे. ही एक कॅशलेस आरोग्य विमा योजना आहे. असंख्य आजारांवर नागरिकांना मोफत उपचार या योजनेद्वारे प्राप्त होत आहे.

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेची (पूर्वीची राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना) सुरुवात महाराष्ट्र शासनाने २ जुलै २०१२ रोजी केली. प्रायोगिक तत्त्वावर ही योजना ८ जिल्ह्यांमध्ये सुरू करण्यात आली होती. २१ नोव्हेंबर २०१३ मध्ये या योजनेचा विस्तार महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये करण्यात आला. सरकारची ही प्रमुख आरोग्य योजना असून सुरुवातीला ती अल्प उत्पन्न गटासाठी सुरू करण्यात आली होती. त्यानंतर या योजनेमध्ये वेळोवेळी इतर गटांचाही समावेश करण्यात आला आहे. २३ सप्टेंबर २०१८ रोजी भारत सरकारतर्फे प्रधानमंत्री जन आरोग्य योजना सुरू करण्यात आली. यापूर्वी या योजनेत समाविष्ट केल्या जाणाऱ्या कुटुंबाची निवड ही ग्रामीण आणि शहरी भागातील अनुक्रमे सामाजिक आर्थिक जात जनगणना २०११ (एसईसीसी२०११) मधील वंचितता आणि व्यावसायिक निकषांवर आधारित होती. महाराष्ट्र सरकारच्या २०२३ मध्ये राज्यातील सर्व कुटुंबासाठी महात्मा ज्योतिराव फुले योजना लागू करण्याच्या निर्णय घेतला. त्यानुसार विस्तारित कार्यक्षेत्रासह एकात्मिक योजना राबवली जात आहे.

## आवश्यक कागदपत्रे कोणती?

**योजनेची वैशिष्ट्ये :** महाराष्ट्र राज्यातील सर्व नागरिकांसाठी आरोग्य संरक्षण. अंगीकृत रुग्णालयांमध्ये रोख रक्कम रहीत द्वितीय आणि तृतीय प्रकारचे उपचार, दरवर्षी ५ लाख रुपयांचे आरोग्य संरक्षण कुटुंबातील एक सदस्य किंवा सर्व सदस्य वापरू शकतात, रुग्णालयांमध्ये ३४ विशेष सेवांतर्गत शस्त्रक्रिया/उपचारांच्या वैद्यकिय सेवा, योजनेत असलेले सर्व आजार पहिल्या दिवसापासून समाविष्ट आहेत. या योजनेशी जोडलेल्या शासकीय आणि खाजगी रुग्णालयात नागरिक मोफत उपचार घेऊ शकतात. प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा लाभ हा देशातील कोणत्याही अंगीकृत रुग्णालयात नागरिकांना घेता येतो. योजनेसाठी माहिती मिळवण्यासाठी आणि सेवांबद्दल तक्रार करण्यासाठी समर्पित असे कॉल सेंटर आहेत. ही योजना पूर्णपणे संगणक प्रणालीद्वारे राबविण्यात येते. नागरिकांना सहाय्य करण्यासाठी योजनेशी जोडलेल्या प्रत्येक रुग्णालयात आरोग्यमित्र नियुक्त केले आहेत.

**उपचारांमधील समाविष्ट घटक :** योजनेशी जोडलेल्या रुग्णालयांना दिल्या जाणाऱ्या पॅकेजच्या दरामध्ये सर्वसाधारण वॉर्डमधील बेडचे शुल्क, नर्सिंग शुल्क, विशेषज्ञ, भूलतज्ञ व वैद्यकीय अधिकारी यांचे शुल्क, तपासणी शुल्क, भुल, ऑक्सीजन, ऑपरेशन थिअटर व अतिदक्षता शुल्क, शस्त्रक्रियेसाठी लागणाऱ्या साहित्याची किंमत, औषध, कृत्रिम अवयवाची किंमत, रक्त संक्रमणाचे दर (राज्य शासनाच्या धोरणानुसार रक्त पुरविणे), इम्प्लॉंट, एक्स-रे व निदान चाचण्या, आंतररुग्णास भोजन, डिस्पोजेबल व कन्झुमेबल, एस टी किंवा रेल्वेच्या द्वितीय श्रेणी भाडे यानुसार वाहतुक खर्च (रुग्णालय ते रुग्णाचे निवासापर्यंत) या खर्चाचा समावेश आहे. रुग्ण रुग्णालयात दाखल झाल्यापासून ते घरी जाईपर्यंतच्या तसेच उपचारादरम्यान काही गुंतागुंत झाल्यास त्यासह संपुर्ण खर्च पॅकेजमध्ये समाविष्ट आहे. जर रुग्णाचा मृत्यू झाला तर रुग्णाचा मृतदेह रुग्णालयातून घरापर्यंत घेऊन जाण्याचा खर्चही योजनेत समाविष्ट आहे.

# काळोखात सूर्य शोधतांना...

*मिथिलेश आणि अंकुश हे दोन भाऊ. त्यांचा जन्म अगदी साधारण कुटुंबात झाला. कुटुंबाची परिस्थिती जेमतेम घरी शेती- बाडी नव्हती. मोलमजुरी करून धावून खाणारी पण आनंदात जगणारी माणसं ती! पण कसल्याच प्रकारची तक्रार नव्हती. सर्व काही सुरळीत चालू होतं. पण नियतीला काही वेगळंच मान्य होतं. एके दिवशी अचानक त्यांचे वडिल आजारी पडले, त्यांच्यावर उपचार सुरु झाले. आतापर्यंत काटकसर करून जी काय मायपुंजी जमा केली होती ती सर्व दवाखान्यावर खर्च झाली. त्यामुळे घराची सर्व जबाबदारी आईवर येऊन पडली. वडिलांची तब्येत मात्र दिवसेंदिवस खालावत चालली होती. औषध उपचार करूनही शरीर साथ देत नव्हतं. ते अगदी अशक्त झाले. डॉक्टरांनी घरी नेण्याचा सल्ला दिला. घरी आणल्यावर दोनच दिवस झाले आणि एका रात्रीच्या प्रहरी त्यांना अचानक झटके आले. आईने घाईगडबडीत पाणी आणून पाजलं त्यांनी घरच्याकडे नजर टाकली. काही क्षण ते न्याहाळत राहिले. त्या नजरेत कितीतरी भावना दडलेल्या होत्या. पण पुढच्या क्षणी त्यांचे हृदय थांबले. एकटक बघणारे डोळे शांत झाले. त्यांची शेवटच्या घटकेला काहीतरी सांगण्याची इच्छा अपूर्णच राहिली.*

आई घरकाम करून मोलमजुरी करू लागली. मिथिलेश ही आईला घरकामात मदत करत आणि स्वतःचे शिक्षण चालू ठेवत होता. अंकुश तेंव्हा तीन वर्षाचा. मिथलेश पदवीच्या शेवटच्या वर्षाला होता. गावात पाण्यासाठी वणवण फिरावे लागतं असे, एके दिवशी आई पाणी आणायला विहरीकडे गेली. मिथिलेश कॉलेजला गेला होता. इकडे अंकुश घरी दारात बसून आईची वाट पाहत बसला. नुकतचं एक संकट त्या घरावर येऊन गेलं होतं. परत त्यांच्या जीवनात काळाने निर्दयी वळण घेतलं आई पाण्याला गेली ती परतलीच नाही. आईला विजेच्या ताराचा शॉक लागून ती मरण पावली. आता दोघांच्या आयुष्यात पूर्ण काळोख पसरला. आईचा आधारही हिरवला गेला. आता फक्त ही दोघंच उरले.

मिथिलेशने ठरवलं, या काळोखात मी माझ्या भावासाठी सूर्य बनेन. त्याने आईवडिलांच दुःख मनात दाबून ठेवलं. कॉलेजच शेवटचं वर्ष त्याने घरून पूर्ण केलं. गावात शिकवणी वर्ग घेऊन दोघांचा उदरनिर्वाह करू लागला. पैसा कमी होता, संकटं मोठी होती. पण त्याने अंकुशचं शिक्षण थांबू दिलं नाही. तो स्वतः भाजीभाकरी करून भावाला खाऊ घालायचा, अंघोळ घालायचा, कपडे धुवायचा, शाळेत तयार करून पाठवायचा. अंकुशला आई वडिलांची आठवण येऊ नये म्हणून त्याने घरात त्यांचे फोटोही लावले नाहीत. भावाचं मन रमावं म्हणून भंगारातून एक जुना टीव्ही आणून दुरुस्त करून चालू केला. मिथिलेशने आलेल्या दुःखाच्या सावटाला मागे टाकले. तो आपल्या भावासाठी जगू लागला. त्याचं शेवटचं वर्ष असल्यामुळे त्याने घरूनच अभ्यास केला व परीक्षा दिली. तो पास झाला. मिथिलेश आपल्या नावाप्रमांणे लहान भावासाठी आईबापाचही कर्तव्य पार पाडू लागला.

आता मिथिलेशने अंकुशसाठी स्वतःचं शिक्षण घेणं सोडलं. पण अभ्यास मात्र सोडला नव्हता. तो वेळ मिळेल तेंव्हा स्पर्धा परीक्षेची तयारी करू लागला व स्पर्धा परीक्षा देऊ लागला. त्याची प्रत्येक वेळेस थोड्या -थोड्या गुणांनी स्पर्धा परीक्षा हुकत होती. त्यामुळे त्याचा हिरमोड व्हायचा. पण त्याने जिद्द सोडली नाही. त्यासाठी तो विविध पुस्तके वाचू लागला. अंकुशच्या घराशेजारी रोहित नावाचा मुलगा राहत होता. त्याच्याकडे सायकल होती. तो अंकुशला चिडवायचा. तु गरीब आहेस. तुझ्याजवळ सायकल नाही! हे मिथिलेश पाहत होता पण गरिबीमुळे काही करू शकत नव्हता. आतून मात्र तो तुटत होता तरीही तो ठाम होता. एवढं अठराविश्व दारिद्र्य त्यांच्या वाट्याला आले होते. कारण गरिबीचे चटके त्याला बसले होते. हे भीषण वास्तव तो अनुभवत होता. पण जिद्द होती की मी 'गरिबीत जन्मलो, पण गरिबीत मारायचं नाही'. त्याच्याजवळ विद्वत्ता होती. तो निराशेने खचला नाही. दररोज टीव्हीवर ' कौन बनेगा करोडपती' कार्यक्रम लागायचा. दररोज न चुकता टीव्हीवर कौन बनेगा करोडपती हा भारतीय टेलिव्हिजन गेम शो ते दोघे भाऊ नियमित पाहत असत. आपल्याला ही कधी ना कधी संधी मिळेल आणि आपण मिळालेल्या संधीचे सोने करू हीच आशा मिथिलेशला होती. यासाठी तो जीवाचं रान करू लागला. रात्रं-दिवस अभ्यास करू लगाला. अखेर एक दिवस त्याच्या प्रयत्नाला यश आले आणि त्याची स्पर्धेत निवड झाली. दोघेही स्पर्धेच्या ठिकाणी पोहोचले.

कुठल्याही परिस्थितीत त्याला ती स्पर्धा जिंकायची होती. अंकुशही स्पर्धेच्या ठिकाणी बसला होता. जेंव्हा मिथिलेशला प्रश्न विचारण्यात यायचा तेंव्हा मात्र अंकुश आपले दोन्ही हात जोडून, डोळे बंद करून आकाशाकडे योग्य उत्तर देण्यासाठी साद घालायचा. आपला भाऊ आता काय उत्तर देणारं. त्यामुळे अंकुशच्या चेहरा चिंताग्रस्त दिसत होता. आता काय होणार हा प्रश्न त्याला मनोमन सतावत होता. सुरु झालेल्या स्पर्धेत मिथिलेशला एकामागून एक असे अनेक प्रश्न विचारण्यात येतात आणि मिथिलेश ही त्या विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे अचूकपणे आपल्या ज्ञानाच्या जोरावर अतिशय शांतपणे दिमाखाने देत होता. स्पर्धा पाहणाऱ्यांची त्या ठिकाणी चिक्कार गर्दी होती. त्यांनाही त्यांची परिस्थिती कळल्यामुळे तेही भावुकपणे प्रोत्साहन देत होते. मिथिलेशची बुद्धी अतिशय तल्लख होती आणि याच तल्लख बुद्धीमत्तेच्या जोरावर त्याने पंचवीस लाखापर्यंत मजल मारली आणि दोन चाकी वाहन सुद्धा जिंकले. त्याला विचारलं की, या पैशाचं काय करणार? तो म्हणाला:' सर्वप्रथम मी माझ्या भावाला सायकल घेणार. आणि उरलेला पैसा त्याच्या शिक्षणासाठी ठेवणार. त्याचं पाहिले उत्तर होतं की मी माझ्या भावाला सायकल घेऊन देणार. एवढ बोलून मिथिलेश स्तब्ध झाला. त्याचे डोळे पाणवले बोलतांना त्याचा कंठ दाटून आला होता. त्याचं स्तब्ध होण्यामागचं कारण म्हणजे त्याला आई बाबाची आलेली आठवण व दुसऱ्या बाजूने अंकुशचे आनंदाश्रू.

स्पर्धा संपली मिथिलेश आणि अंकुश आपल्या घरी आले. मिथिलेशने अंकुशसाठी एक नवीन सायकल विकत घेतली आणि बाकी पैसे हे अंकुशच्या पुढील शिक्षणासाठी जमा ठेवले. सायकलमुळे अंकुशचा चेहरा प्रफुल्लित दिसू लागला. त्याच्या चेहऱ्यावरचं तेज अगोदरपेक्षा काही औरच दिसू लागलं. अंकुशच्या चेहऱ्यावरची चमक पाहून मिथिलेशचा आनंद अवर्णनीय झाला. दोघेही खूप आनंदी दिसत होते. काळोखात सूर्य शोधतांना... अखेर त्यांच्या जीवनात सूर्य उजाडला!


डॉ. राहुल मधुकर मघाडे
सदस्य, जागतिक संविधान आणि संसद संघटना अमेरिका (यूएसए)
मो. ८७८८८७८२९३

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर ८३९०६७०९९९ या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा. त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सिटी न्यूज अमरावती
गुरुवार, दि. ९ एप्रिल २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# बस स्थानकावर स्वच्छता अभियानाचा फज्जा !

## अकोला बसस्थानकात झाले कचऱ्याचे साम्राज्य

**अकोला:** संपूर्ण राज्यात बस स्थानके स्वच्छ राहावीत आणि प्रवाशांना सोयी-सुविधा मिळाव्यात या उद्देशाने 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ बस स्थानक अभियान' राबवले जात आहे. मात्र, हे अभियान किती गांभीर्याने राबवले जातेय, याची प्रचिती अकोला शहराच्या नवीन बसस्थानकाची विदारक अवस्था पाहून येत आहे. अकोल्याचे नवीन बसस्थानक स्वच्छता सर्वेक्षणाच्या 'अ' वर्गात येते. या अभियानांतर्गत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या बस स्थानकांना पुरस्कार दिले जाणार आहेत. यामध्ये स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, प्रसाधनगृहांची स्थिती, पिण्याचे पाणी, प्रवासी निवारा आणि पार्किंग अशा विविध निकषांवर मूल्यमापन केले जाते. नुकतेच महामंडळाच्या तपासणी पथकाने या स्थानकाचे सर्वेक्षणही केले. मात्र, सर्वत्र पसरलेली अस्वच्छता पाहता हे सर्वेक्षण नेमके कसे झाले, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# पतंजली योग समितीतर्फे योग शिबीर

**अकोला:** पतंजली योग समिती तर्फे श्री संत गजानन महाराज मंदिर इंजिनिअर कॉलनी येथे १५ ते २० एप्रिल योग शिबिराचे आयोजन सकाळी ६.०० ते ७.१५ ह्या वेळेत करण्यात आले आहे. हया शिबिरात हरिद्वार येथील प्रशिक्षित योग तज्ञ डॉ. सुहास काटे जिल्हा प्रभारी पतंजली योग समिती अकोला मुख्य योग शिक्षक विजय धोत्रे, कुलभूषण बोमले, सुनिता कावळे, क्षितीजा वडी, श्रीकांत चाळीसगावकर व विशाल हूरबडे प्राणायाम, मुद्रा, अष्टांग योग, सूर्यनमस्कार व विविध प्रकारचे आसन द्वारे विविध रोग मधुमेह, रक्तदाब, अनिद्रा, अर्धांगवायू, एसिडिटि कैंसर, वातविकार, गुडघे दुखी कसे बरे होऊ शकतात ह्याविषयी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. परिसरातील योग प्रेमी महिला पुरुष ह्यांनी ह्याचा लाभ घ्यावा हि विनंती.

# रंभापूर फाटा- सावरा- अकोट- हिवरखेड मार्गावर जीवघेणी परिस्थिती

वि. प्रतिनिधी ९ एप्रिल



**अकोट :** रंभापुर फाटा ते सावरा, सावरा ते अकोट आणि अकोट ते हिवरखेड तसेच सोनाळा सीमेपर्यंत सुरू असलेल्या सिमेंट रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या कामामुळे संपूर्ण परिसरात सध्या अक्षरशः धुळीचे साम्राज्य पसरले आहे. नियोजनशून्य आणि संथ गतीने सुरू असलेल्या या कामामुळे नागरिकांचे जीवन अक्षरशः धुळीत मिळाले असून संबंधित विभागाच्या निष्काळजीपणावर तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

जुना रस्ता पूर्णपणे उखडून टाकल्यानंतर नव्या रस्त्याचे काम सुरू करण्यात आले आहे. मात्र, खोदकामानंतर निर्माण झालेल्या धुळीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यक असलेली पाण्याची नियमित फवारणी होत नसल्याचे गंभीर वास्तव समोर आले आहे. परिणामी, रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनांमुळे धुळीचे मोठे ढग हवेत उडत असून वाहनचालकांसाठी हा मार्ग धोकादायक बनला आहे.

या मार्गावर दिवस-रात्र मोठ्या वाहनांची वर्दळ असते. उडणाऱ्या धुळीमुळे वाहनचालकांना समोरचे काहीच दिसत नसल्याने मोठ्या अपघाताची भीती निर्माण झाली आहे. ङ्गअपघात झाल्यास जबाबदार कोण?ङ्ग असा थेट सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

रस्त्यालगत राहणाऱ्या नागरिकांची अवस्था अधिक बिकट झाली आहे. घरात, अंगणात, अन्नात आणि श्वासातही धूळ भरल्याने लोक त्रस्त झाले असून त्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. विशेषतः लहान मुले आणि वृद्धांमध्ये श्वसनाचे आजार वाढत असल्याची माहिती समोर येत आहे.

अमरावती, अकोला, बुलढाणा आणि मध्यप्रदेशला जोडणारा हा महत्त्वाचा मार्ग असूनही संबंधित विभागाकडून याकडे पूर्णतः दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. कामाची गती अत्यंत मंद असल्याने ही समस्या दिवसेंदिवस अधिक तीव्र होत आहे.

नागरिकांनी आता स्पष्ट इशारा दिला आहे की, तात्काळ पाण्याची फवारणी वाढवून आणि कामाला गती देऊन परिस्थिती सुधारली नाही, तर तीव्र आंदोलन उभारले जाईल.

**नागरिकांवर होणारे गंभीर परिणाम**

**आरोग्य धोक्यात :** धुळीमुळे दमा, खोकला, सर्दी, डोळयांची जळजळ यांसारख्या तक्रारींमध्ये वाढ

**अपघाताचा धोका वाढला :** धुळीच्या ढगांमुळे वाहनचालकांना समोरचे दिसत नाही

**प्रदूषणात भर :** धुळीसोबतच मशिनरीमुळे ध्वनीप्रदूषण वाढले रस्त्याचे काम की नागरिकांच्या जीवाशी खेळ? प्रशासनाने तात्काळ जागे होण्याची गरज!

# शिवसेनेच्या जिल्हाप्रमुखपदी मुकेश मुरूमकार यांची डरकाळी!

## 'मातोश्री' वर उद्धव ठाकरेंच्या हस्ते मोठी जबाबदारी



प्रतिनिधी ९ एप्रिल

**अकोला:** आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने अकोला जिल्ह्यात संघटनात्मक फेरबदल करत मोठी खेळी खेळली आहे. शिवसेनेचे निष्ठावान आणि आक्रमक नेते मुकेश मुरूमकार यांची शिवसेनेच्या जिल्हाप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे.बुधवारी मुंबईतील 'मातोश्री' निवासस्थानी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या हस्ते मुरूमकार यांना नियुक्तीपत्र देऊन त्यांच्या खांद्यावर जिल्ह्याची नवी जबाबदारी सोपवण्यात आली.

मुकेश मुरूमकार यांच्याकडे जिल्ह्यातील अकोट आणि मूर्तिजापूर या दोन महत्त्वाच्या विधानसभा मतदारसंघांची विशेष जबाबदारी सोपविण्यात आली आहे. या दोन्ही मतदारसंघात शिवसेनेची ताकद वाढवून आगामी निवडणुकीत भगवा फडकवण्याचे आव्हान आता मुरूमकार यांच्यासमोर असणार आहे. या नियुक्ती प्रसंगी शिवसेनेचे उपनेते तथा आमदार नितीन देशमुख यांच्यासह पक्षाचे अनेक वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित होते. उपजिल्हाप्रमुख म्हणून कार्यरत असताना मुरूमकार यांनी केलेल्या संघटनात्मक कार्याची पावती म्हणून त्यांना ही बढती मिळाल्याचे मानले जात आहे. या नियुक्तीमुळे अकोला जिल्ह्यातील शिवसैनिकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, ठिकठिकाणी फटाके फोडून या निर्णयाचे स्वागत करण्यात येत आहे.

# अवैध दारूविक्री व जुगाराविरोधात जनजागृतीसाठी कावसा येथे आज आमसभा

**कुटासा:** अकोट तालुक्यातील कावसा व तरोडा परिसरात वाढत्या अवैध दारूविक्री व जुगाराच्या प्रकारांमुळे नागरिकांच्या आरोग्यावर व सामाजिक वातावरणावर विपरीत परिणाम होत असल्याची चिंता व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर गावातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे तसेच व्यसनमुक्त, निरोगी समाजाची निर्मिती करण्याच्या उद्देशाने आज ग्राम कावसा येथे जनजागृतीपर आमसभेचे आयोजन करण्यात आले आहे.ही आमसभा दि. ८ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजता जिल्हा परिषद शाळा, कावसा बुद्रुक येथे होणार असून परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या सभेला दारूबंदी विभाग, पोलीस प्रशासन व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. यामध्ये पोलीस अधीक्षक (दारूबंदी) सीमाताई झावरे, पोलीस निरीक्षक कांबळे साहेब, उपविभागीय पोलीस अधिकारी (IPS) निखिल पाटील, ज्येष्ठ समाजसेवक गजानन हरणे, पत्रकार संजय गावंडे, सरपंच शिवदासजी बुटे, उपसरपंच पांडुरंग वानखडे, सरपंच सुनिता राजेश दामोदर (तरोडा), ठाणेदार गोपाल ढोले, समाजसेवक देवरावजी अहिर, समन्वय महासंघ अकोलाचे अध्यक्ष धम्मबोधी डोंगरे, माजी पोलीस उपनिरीक्षक मनोहर वानखडे, सामाजिक कार्यकर्ते गजानन कदम व हरिभाऊ लोणकर आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

# श्री भास्कर महाराज पुण्यतिथी महोत्सव संपन्न



प्रतिनिधी ९ एप्रिल

**अकोट:** अकोट हिवरखेड मार्गावरील श्री गजानन महाराज संस्थान शेगावची शाखा असलेल्या ,श्री भास्कर महाराज समाधी स्थळ अडगाव बु.येथे, श्री संत गजानन महाराजांचे पट्टशिष्य श्री संत भास्कर महाराजांचा ११९ वा पुण्यतिथी महोत्सव ७ एप्रिल रोजी संपन्न झाला. श्री क्षेत्र भास्कर नगर अडगाव बु. येथे ३१ मार्च पासून पुण्यतिथी सप्ताह प्रारंभ होऊन त्यामध्ये ज्ञानेश्वरी पारायण , कीर्तन , गाथा भजन इ.कार्यक्रम संपन्न झाले . दि.७ एप्रिल रोजी श्री भास्कर महाराज पुण्यतिथी निमित्त प्रथम सकाळी ७ वाजतापासून दिंड्या व पालखीची श्री क्षेत्र परिक्रमा झाली .या परिक्रमेत श्रींचे पट्टशिष्य भास्कर महाराजांच्या पादुका व रजत मुखवट्याची चांदीच्या पालखीतून मिरवणूक काढण्यात आली. या परिक्रमेत अग्रभागी श्रींची पालखी व सोबत या उत्सवाकरीता बाहेर गावाहून आलेल्या कापुसतळणी, गायवाडी , बोरगाव वैराळे , दहिगाव ,अकोट इत्यादी ठिकाणच्या सर्व दिंड्या व पालख्यांनी सहभाग घेतला. ॐ गजानन नमो नमः, ॐ भास्कराय नमो नमः ,अशा श्री गजानन महाराज व भास्कर महाराजांच्या जयघोषाने श्री भास्कर नगरी दुमदुमून गेली होती. सकाळी १० ते १२ वाजेर्यंत ज्ञानेश्वर महाराज गावंडे यांचे काल्याचे कीर्तन झाले . कीर्तनात त्यांनी श्री भास्कर महाराज समाधी प्रसंगाचे वर्णन केले .श्रींनी आपले पट्टशिष्य भास्कर महाराजांना सन १९०७ मध्ये चैत्र कृ.५ ला दुपारी १२ वाजता स्वहस्ते समाधी दिली होती . म्हणून दुपारी १२ वाजता काल्याचे कीर्तनानंतर हजारो भाविकांनी टाळ व मृदंगाच्या गजरात गुरू शिष्यांच्या नावाचा जयघोष केला व आरती संपन्न झाली.

# निधन वार्ता

## शेवताबाई इंगळे



**अमरावती :** आंबेडकरी चळवळीतील नेते अमोल इंगळे यांच्या मातोश्री (आई) ग.भा. शेवताबाई रामदास इंगळे यांचे दुःखद निधन आज ८/०४/०२६ रोजी दुपारी झाले. तरी त्यांचा अंत्यविधी कार्यक्रम आज ०९/०४/०२६ रोजी ११ वा. त्यांच्या निवासस्थानी मातोश्री रमाबाई आंबेडकर नगर येथून विलास नगरातील स्मशानभूमी विलास नगर येथे अंतिम विधीचा कार्यक्रम करण्यात येईल.

# पातूर तालुक्यात प्रशासनावर दहशतीचे सावट; कर्मचाऱ्यांमध्ये निरुत्साह वाढला

प्रतिनिधी ९ एप्रिल

**पातूर:** पातूर तालुक्यातील शासकीय कार्यालयांमध्ये सध्या अस्थिरता आणि दबावतंत्राचा वाढता प्रभाव दिसून येत असून, यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात निरुत्साह निर्माण झाला आहे. लोकप्रतिनिधींच्या हस्तक्षेपामुळे अनेक कर्मचाऱ्यांना मनमानी कामे करण्यासाठी दबाव टाकला जात असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत.

सूत्रांच्या माहितीनुसार, काही ठिकाणी कर्मचाऱ्यांना खोटी किंवा नियमबाह्य कामे करण्यासाठी भाग पाडले जात असून, नकार दिल्यास बदलीची धमकी दिली जाते. या प्रकारामुळे अनेक कर्मचारी मानसिक तणावाखाली काम करत आहेत.

पातूर पंचायत समितीमध्ये गटविकास अधिकाऱ्यांच्या पदावर गेल्या एका वर्षात पाच ते सहा वेळा बदल करण्यात आले असून, अनेकांना प्रभारी म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. या सततच्या बदलामुळे प्रशासनाचा गाडा विस्कळीत झाला असून, विकासकामांवर त्याचा परिणाम होत आहे. तसेच पातूर नगरपरिषदेमध्येही गेल्या दोन वर्षांपासून मुख्याधिकारी पदावर कायमस्वरूपी अधिकारी नसून, प्रभारी अधिकाऱ्यांवरच संपूर्ण कारभार चालत आहे. त्यामुळे निर्णय प्रक्रियेत विलंब होत असून, नागरिकांना आवश्यक सेवा वेळेत मिळत नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

या सर्व परिस्थितीमुळे पातूर तालुक्यात गटविकास अधिकारी आणि मुख्याधिकारी या महत्त्वाच्या पदांवर काम करण्यासाठी अधिकारी पुढे येण्यास टाळाटाळ करत असल्याचे चित्र आहे. लोकप्रतिनिधींच्या दबावामुळे प्रशासनातील पारदर्शकता आणि कार्यक्षमता धोक्यात आली असल्याची भावना नागरिकांमध्येही व्यक्त होत आहे. याबाबत संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून परिस्थिती सुधारावी, तसेच कर्मचाऱ्यांना निर्भयपणे काम करण्यासाठी योग्य वातावरण निर्माण करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# जलजीवन मिशन अंतर्गत बांधलेली विहीर कोरडी

## संतप्त ग्रामस्थांचा विहिरीत उतरून उपोषणाचा इशारा

प्रतिनिधी ९ एप्रिल

**अकोला:** अकोला जिल्ह्यात उन्हाचा पारा वाढल्याने ग्रामीण भागात पाणीटंचाईचे चटके बसू लागले आहेत. बार्शीटाकळी तालुक्यातील धामणदरी गावात जलजीवन मिशन योजनेअंतर्गत खोदलेली विहीर कोरडी असल्याने, संतप्त ग्रामस्थांनी आता थेट विहिरीत उतरून उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. वाढत्या उष्णतेमुळे ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण फिरावे लागत आहे. यातच एक धक्कादायक बाब समोर आली आहे ती म्हणजे, शासनाच्या जलजीवन मिशन अंतर्गत धामणदरी गावात विहीर तर खोदण्यात आली, मात्र त्यात पाणी साठवण्याची कोणतीही ठोस व्यवस्था करण्यात आलेली नाही.परिणामी, ही विहीर सध्या कोरडीठाक पडली असून योजनेचा मूळ उद्देशच धोक्यात आला आहे. या पाणीटंचाईमुळे वैतागलेल्या ग्रामस्थांनी वारंवार जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभाग आणि बार्शीटाकळी पंचायत समितीकडे तक्रारी केल्या, परंतु अद्याप त्यावर कोणताही ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही.प्रशासनाच्या या उदासीन कारभाराला कंटाळून अखेर ग्रामस्थांनी जलजीवन मिशनच्या याच कोरड्या विहिरीत उतरून उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. आता तरी जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी या प्रकरणाची दखल घेऊन योग्य ती कारवाई करतील का? असा संतप्त सवाल गावकरी विचारत आहे.

# रामदेव बाबांच्या जम्मा जागरणाला भाविकांची अलोट गर्दी

प्रतिनिधी ९ एप्रिल



**अडगांव बु. :** 'खम्मा खम्मा हो म्हारा रुणीचे रा धनियाँ...' च्या जयघोषात आणि भक्तिमय वातावरणात स्थानिक अडगांव बु येथे रामदेव बाबांचा १९ वा भव्य 'जम्मा जागरण' सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. राजस्थानी समाजाचेआराध्य दैवत असलेल्या रामदेवजी महाराज यांच्या या उत्सवासाठी भाविकांचा जनसागर लोटला होता. मुख्य यजमान कौस्तुभ भट्टड व परिवाराच्या हस्ते महापूजेने झाली. जालना येथील सुप्रसिद्ध गायक मनीष आणि शुभम दायमा बंधूंनी आपल्या सुमधुर वाणीतून रामदेव बाबांचे जीवनचरित्र आणि त्यांचे चमत्कार भाविकांसमोर जिवंत केले. रात्री ८ वाजल्यापासून सुरू झालेल्या या जागरणात हिंदी, मराठी आणि राजस्थानी भजनांची मेजवानी होती. 'कीर्तन की है रात', 'पाळा पाळा चालो बाबो भली करेला', आणि 'विठ्ठल विठ्ठल विठ्ठला' यांसारख्या गीतांवर भाविक मंत्रमुग्ध होऊन डोलू लागले. बाबांचा नयनरम्य श्रृंगार, छप्पन भोग आणि आकर्षक रोषणाईने सोहळ्याची शोभा द्विगुणित केली होती. संपूर्ण अडगांव नगरी स्वागत कमानींनी सजवण्यात आली होती. भाविकांसाठी फराळ,महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी रामदेव बाबा सेवा समिती, राजस्थानी महिला मंडळ, आणि सुंदरकांड सेवा समितीच्या सदस्यांनी दिवसरात्र परिश्रम घेतले.

# स्पर्धेतील प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांना खेंडकर विद्यालयात वार्षिक बक्षीस वितरण

प्रतिनिधी ९ एप्रिल






**अकोला:** सरस्वती नगर, जुना वाशीम बायपास स्थीत स्व. यमुनाबाई खेंडकर प्राथमिक शाळा, विष्णुपंत खेंडकर विद्यालयात आणि स्व. नारायणराव खेंडकर कॉन्व्हेंट मधे बक्षीस वितरण कार्यक्रम मोठ्या उत्साहात सपन्न झाला.

दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा खेडकर विद्यालयांमध्ये संपूर्ण वर्षभर विविध उपक्रम व कार्यक्रम, स्पर्धा राबविल्या जातात. त्याच अनुषंगाने प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन त्यांना प्रोत्साहन दिल्या जाते व गौरव केला जातो. यामध्ये महात्मा गांधी जयंती, स्वर्गीय आईसाहेब खेडकर स्मृतीदिनानिमित्त विविध स्पर्धा, स्काऊट गाईड, कब बुलबुल शिबिर व त्या माध्यमातून होत असलेल्या स्पर्धा तसेच वार्षिक स्नेहसंमेलनमध्ये खेळ व विविध रगारक कार्यक्रमाचे आयोजन होत असते. यामध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय तसेच विशेष प्रोत्साहन पर विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले. यावेळी कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक निलेश खेंडकर, तसेच कार्यकमाला प्रमुख पाहुने म्हणून महाराष्ट्र राज्य खाजगी शिक्षक संघटनेचे उपाध्यक्ष व प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक अल्केश खेंडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांच्या हस्ते सरस्वती प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षांनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा व प्रोत्साहन मिळावे त्यासाठी दरवर्षी बक्षीस वितरण केल्या जाते असे मार्गदर्शन केले. दरम्यान यावेळी कॉन्व्हेंट विभाग, प्राथमिक शाळा व माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी बक्षीस मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. यावेळी कार्यक्रमाचे संचालन आशा हिवरकर यांनी केले, तर आभार सुरेश सुरत्ने यांनी व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी शाळेतील शिक्षक प्रज्ञानंद थोरात, श्रीकांत पागृत, गोपाल वानखडे, सुरेश सुरत्ने, प्रशांत काळे, उषा जगदाळे, कांचन वानखडे, मिना घाटोळे, अश्विनी सोळंके, अंजु मुंढे, रूपाली उन्हाळे, सुकेशनी ओहेकर, छाया इंगळे, वर्षा मते, वर्षा खेडकर, माया खोडके, प्रणाली धोटे, मेघा शर्मा यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाच्या यशास्वीतेसाठी शाळेतील शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य मिळाले.

# नापिकी व कर्जामुळे युवा शेतकऱ्याची आत्महत्या

**बाळापूर :** गेली काही वर्षापासून होत असलेली सततची नापिकी व कर्जबाजारी पणाला कंटाळून अखेर मांडवा बु. येथील ४२ वर्षीय शेतकऱ्याने शेतात गळफास लावून आत्महत्या केल्याची दर्दैवी घटना मंगळवारी रात्री घडली. या संदर्भात मिळालेल्या माहितीनुसार, बाळापूर येथून जवळच असलेल्या मांडवा बु. येथील हा युवक शेती करीत होता. मात्र गेली काही वर्षापासून सततची नापिकी व वाढत असलेला कर्जाचा डोंगर यामुळे विवचनेत असलेल्या गोपाल नारायण शिंगोटे (४२) नामक शेतकऱ्याने अगदी टोकाचा निर्णय घेवून गळफास लावून जिवन यात्रा संपविली आहे. मांडवा येथे बुधवारी दुपारी गोपाल शिंगोटे यांचेवर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पत्नी, दोन मुले असा आप्तपरिवार आहे.

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ ५२२६

मॉं. गायत्री प्राथमिक शाळा व
स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय
गायत्री नगर. अकोला

आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर,
प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!

वैशिष्ट्ये :
1)अनुभवी शिक्षकवृंद
2)सुसज्ज पायाभूत ईमारत
3)दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
4)सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
5)आनंददायी शिक्षण पध्दती
6)CCTV ची सुविधा
7)कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
8)सुसज्ज प्रयोगशाळा

इयत्ता 1 ली ते 10 वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.
1)इयत्ता 1 ली ते 8 वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
2)इयत्ता 1 ली ते 10 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
3)शालेय पोषण आहार



मॉं गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय
मो. 9921186715, 9511254959, 9421895790, 9960437366

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
गुरुवार, दि. ९ एप्रिल २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# कत्तलीसाठी जनावरांची तस्करी

## दोन आरोपींना अटक; दोन वाहने जप्त

प्रतिनिधी ९ एप्रिल



**राळेगाव :** राळेगाव–मेटीखेडा रस्त्यावर बेकायदा कत्तलीसाठी जनावरे वाहतुक करणाऱ्या दोन तरुणांना स्थानिक पोलीसांनी अटक केली आहे. या कारवाईत दोन वाहने जप्त करण्यात आली.

आकाश ज्ञानेश्वर साखरकर (वय ३०, रा. 32 वय अल्लीपुर, हिंगणघाट) आणि प्रफुल लक्ष्मण महाकाळकर (वय १९, रा. भावनी वार्ड, अल्लीपुर, हिंगणघाट) अशी आरोपींची नावे आहे. दोन वाहनांमध्ये जनावरे निर्बंधांशिवाय वाहतूक केली जात असल्याची माहिती राळेगाव पोलिसांना मिळाली होती.

रस्त्यावर वाहने थांबवून तपासणी केली असता टाटा एस वाहन क्र. एम.एच. 05 बीएच 7327 मधून ३ गोवंश जातीचे गोरे मिळाले असून, किंमत ३०,००० रुपये आहे. तर बुलेरो पिकअप वाहन क्र. एम.एच. 40 एन 1439 मधून २ लाख्या रंगाचे बैल मिळाले असून, किंमत ४०,००० रुपये आहे.

दोन्ही वाहनांमध्ये जनावरे गळ्यात आखुड दोरीने बांधून, चारापाण्याची कुठलीही सोय न करता वाहतूक केली जात होती.

आरोपी आकाश साखरकर, प्रफुल महाकाळकर यांच्यावर प्राण्यांना निर्दयतेने वागवण्यास प्रतिबंध कायदा, महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम कलम ५ (अ) (१) (२), कलम ११ (१), (घ), (ड),(झ) तसेच कलम ११९ अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

सदर कारवाई पोलीस अधिक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधिक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी रॉबिन बन्सल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शितल मालटे, सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेशकुमार दंदे, पोलीस उपनिरीक्षक विशाल बोरकर, पोलीस अंमलदार सुरज चिव्हाणे, विशाल कोवे, प्रतीक्षा तितरमारे यांनी केली.

# दारू दुकान, वाईनबार बंदीसाठी १६ एप्रिलला मतदान



प्रतिनिधी ९ एप्रिल

**महागाव :** शहरातील प्रभाग क्रमांक १ मधील वसंतराव नाईक चौक परिसरातील दारू दुकान व वाईनबार हटविण्याच्या मागणीवरून १६ एप्रिल रोजी महिलांचे मतदान घेण्यात येणार असल्याची माहिती नगराध्यक्ष रंजना आडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. रहिवासी महिलांच्या आंदोलनाची दखल घेत राज्य उत्पादन शुल्क विभागाने ही प्रक्रिया हाती घेतली आहे.

नगराध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पत्रकार परिषदेत माजी उपनगराध्यक्ष सुरेश नरवाडे यांनी या मुद्द्यावर नगरविकास आघाडी एकजूट असल्याचा दावा केला. "प्रभागातील दारू दुकान बंद करण्याच्या प्रश्नावर सर्व १३ नगरसेवक एकत्र आहेत," असे त्यांनी स्पष्ट केले. उपनगराध्यक्ष प्रमोद भरवाडे, नगरसेवक रामराव नरवाडे, सुरेश पाटील नरवाडे, गजानन साबळे आदी यावेळी उपस्थित होते.

### वाईनबार बंदीवर मतभेद

■ नगरसेवक गजानन साबळे यांनी वाईनबार बंदीच्या मुद्द्यावर आघाडीशी असहमती दर्शवली. "प्रभाग क्रमांक १ व १७ मधील देशी दारू दुकाने बंद करण्याचा ठराव पूर्वीच झाला होता. मात्र, जवळपास ३० वर्षे जुना वाईनबार बंद करण्याचा विषय त्यात नव्हता. आता तो अचानक समाविष्ट करण्यात आला आहे," असे ते म्हणाले. दारू दुकान बंदीला पाठिंबा असला तरी वाईनबार बंदीला विरोध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, वसंतराव नाईक यांच्या तैलचित्राजवळ असलेल्या दारू दुकानाविरोधात महिलांनी उभारलेल्या लढ्यामुळे हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर मतदान प्रक्रिया राबविण्यात येत असल्याचे सांगण्यात आले.

मात्र, या मुद्द्यावर नगरविकास आघाडीत अंतर्गत मतभेद असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. पत्रकार परिषदेला आघाडीतील तीन नगरसेवक अनुपस्थित राहिल्याने या चर्चांना अधिक बळ मिळाले.

### तीन नगरसेवक अनुपस्थित

■ या विषयावर माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेला नगरविकास आघाडीतील तीन नगरसेवक गैरहजर राहिल्याने आघाडीत सर्व काही सुरळीत नसल्याचे चित्र समोर आले आहे.

# ग्रामीण भागात पुन्हा पेटल्या चुली



प्रतिनिधी ९ एप्रिल

**उमरखेड :** ग्रामीण भागात स्वयंपाकासाठी लागणाऱ्या गॅसचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. गॅस वेळेवर उपलब्ध न झाल्यामुळे अनेक ठिकाणी महिलांना पुन्हा पारंपरिक चुलींचा आधार घ्यावा लागत आहे.

पूर्वी उज्ज्वला योजनेमुळे अनेक घरांमध्ये गॅस पोहोचला होता. मात्र सध्याच्या परिस्थितीत गॅस सिलिंडर मिळण्यासाठी १० ते १५ दिवसांचा विलंब होत असल्याने महिलांसमोर स्वयंपाक कशावर करायचा हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

यामुळे ग्रामीण भागात पुन्हा चुली पेटू लागल्या आहेत. मात्र चुलीसाठी लागणारे सरपण आणि जळण मिळवण्यासाठी महिलांना मोठी धावपळ करावी लागत आहे. त्यातच सरपणाचे दरही वाढले असून काही ठिकाणी ते गॅसपेक्षाही महाग पडत आहे. चुलीच्या धुरामुळे महिलांच्या डोळ्यांना आणि आरोग्याला त्रास होत असून आजारांचे प्रमाण वाढत आहे. अशा परिस्थितीत ग्रामीण भागात पारंपरिक पद्धती पुन्हा वापरात येताना दिसत आहेत.

# यवतमाळ शहराचे तापमान ३६ अंशावर

प्रतिनिधी ९ एप्रिल

**यवतमाळ :** ढगाळी वातावरण आणि वातावरणात झालेल्या बदलाने यवतमाळ जिल्ह्यातील उन्हाचा पारा ३६ अंशापर्यंत खाली आला. बुधवारी तापमानात झालेल्या या बदलाने नागरिकांना थोडा दिलासा मिळाला. मात्र पुढील आठवड्यात उन्हाचा चटका वाढण्याचा अंदाजही वेधशाळेने वर्तविला आहे. यामुळे नागरिकांना स्वताची काळजी घ्यावी लागणार आहे. उन्हाचा पारा चढत असल्याने ग्रामीण भागात कामांच्या वेळापत्रकात बदल झाला आहे. तासांप्रमाणे ग्रामीण भागात आता काम केले जात आहे.

तापमानात चढउतार होत असला तरी शहरी भागात शीतपेयांचे दुकान मोठ्या प्रमाणात वाढत आहे. दिवसा उन्हाचा चटका वाढल्याने घराबाहेर पडणाऱ्या नागरिकांचे वेळापत्रकही पूर्णतः बदलले आहे.

# दारव्हा तहसील कार्यालयात पिण्याचे पाणी नाही

## नागरिकांची गैरसोय; तत्काळ व्यवस्था करण्याची मागणी

प्रतिनिधी ९ एप्रिल



**दारव्हा :** तालुक्यातील विविध शासकीय कामांसाठी तहसील कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पिण्याच्या पाण्याची कोणतीही सुविधा उपलब्ध नसल्याने मोठी गैरसोय होत आहे. या पार्श्वभूमीवर तहसील कार्यालय परिसरात त्वरित शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी बहुजन मुक्ती पार्टीने केली आहे.

तालुक्यात सुमारे ८६ ग्रामपंचायती असून नागरिकांना तहसील कार्यालय, उपविभागीय कार्यालय, भूमी अभिलेख, सेतू केंद्र, आधार अपडेट केंद्र तसेच दुय्यम निबंधक कार्यालय अशा विविध कामांसाठी वारंवार ये-जा करावी लागते. एप्रिल महिन्यातील वाढत्या उष्णतेमुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्याची तीव्र गरज भासत असतानाही तहसील कार्यालयात कोणतीही ठोस व्यवस्था नसल्याचे दिसून येते.

बहुजन मुक्ती पार्टीचे यवतमाळ-वाशीम लोकसभा अध्यक्ष बिमोद मुधाने यांनी प्रसिद्धी माध्यमांद्वारे तहसीलदार दारव्हा यांच्याकडे ही मागणी मांडली आहे. नागरिकांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन प्रशासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# देशी कट्ट्यासह दहशत माजवणारा तरुण जेरबंद

## शहर डी.बी. पथकाची कारवाई

प्रतिनिधी ९ एप्रिल



**यवतमाळ :** शहरात देशी बनावटीचा कट्टा बाळगून दहशत माजवणाऱ्या एका तरुणाला यवतमाळ शहर पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रगटीकरण पथकाने (डी.बी.) अटक केली. ही कारवाई ८ एप्रिल २०२६ रोजी रात्री पेट्रोलिंगदरम्यान करण्यात आली.

कुणाल शिवदास गीते वय २०, रा. ग्रामपंचायत जवळ, मासोळी पोड, मोहा, यवतमाळ असे आरोपीचे नाव आहे. पिंपळगाव–धामणगाव मार्गावर संशयित फिरत असल्याची माहिती मिळाली होती. त्यावरुन यवतमाळ शहरचे ठाणेदार पोलीस निरीक्षक रामकृष्ण जाधव यांनी डी.बी. पथकास सापळा रचण्याचे निर्देश दिले. त्यावरुन पथकाने आरोपी कुणाल गीते याला ताब्यात घेवून त्याच्याकडून झडती दरम्यान २५,००० रुपयांचा देशी बनावटीचा कट्टा जप्त करण्यात आला. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन यवतमाळ शहर येथे कलम ३, २५ शस्त्र अधिनियम १९५९ प्रमाणे गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधिक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधिक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रामकृष्ण जाधव यांच्या नेतृत्वात पो.उप.नि. गणेश सपकाळ, पो.उप.नि. दिपक घोगरे, पो.हवा. रावसाहेब शेंडे, पो.शि. किरण पडघण, पो.शि. गौरव ठाकरे, पो.शि. पवन नांदेकर, पो.शि. पवन तडसे, पो.शि. प्रदिप कुरडकर, पो.शि. मयुर तेल्लेवार, पो.शि. प्रतिक नेवरे यांनी केली.

# बाभूळगावात अत्याधुनिक प्रयोगशाळा

## तालुका स्तरावर ९७ प्रकारच्या रक्त तपासण्या मोफत

प्रतिनिधी ९ एप्रिल



**बाभूळगाव :** जागतिक आरोग्य दिनानिमित्त तालुका बाभूळगाव येथे सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेचे उद्घाटन उत्साहात पार पडले. तहसीलदार मीरा पागोरे व अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, यवतमाळ डॉ. कृष्णदास बानोत यांच्या हस्ते फीत कापून या अत्याधुनिक प्रयोगशाळेचा शुभारंभ करण्यात आला.

उद्घाटनानंतर मान्यवरांनी प्रयोगशाळेतील आधुनिक यंत्रसामुग्री, तपासणी प्रक्रिया व उपलब्ध सुविधांची पाहणी करून समाधान व्यक्त केले. या प्रयोगशाळेमार्फत तालुका स्तरावर तब्बल ९७ प्रकारच्या रक्त तपासण्या मोफत उपलब्ध होणार असून, अहवालही अल्पावधीत मिळणार आहेत. या प्रयोगशाळेत शुगर, हिमोग्लोबिन, थायरॉईड, सिकल सेल, क्षयरोगासाठी थुंकी तपासणी, मलेरिया, डेंग्यू, टायफाईड आदी विविध आजारांचे अचूक निदान करता येणार आहे. आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध झाल्यानंतर प्रयोगशाळा २४x७ कार्यान्वित ठेवण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

या उपक्रमामुळे तालुक्यातील नागरिकांना स्थानिक स्तरावरच गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा मिळणार असून आरोग्य व्यवस्थेला मोठी बळकटी मिळणार आहे. नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

या प्रसंगी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संघर्ष राठोड, वैद्यकीय अधिकारी डॉ. सुषमा पांडे, डॉ. मारोती बोंबले, डॉ. अर्पित भगत, डॉ. शुभम राठोड, डॉ. गोपाल गायकवाड, डॉ. पद्मजा वटे, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी कु. तृप्ती मरसकोल्हे तसेच समुदाय आरोग्य अधिकारी, गटप्रवर्तक, आशासेविका व आरोग्य विभागातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उमरखेड मतदार संघातील प्रलंबित विकास कामांचा आढावा

प्रतिनिधी ९ एप्रिल




**उमरखेड :** उमरखेड–महागाव विधानसभा मतदारसंघातील सुरू असलेली तसेच प्रलंबित विकास कामे वेळेवर होण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, महसूल भवन येथे आढावा बैठक पार पडली. बैठकीत विविध प्रकल्पांची सध्यस्थिती, अडचणी व पुढील कार्यवाही यावर सखोल चर्चा करण्यात आली.

बंदी भागातील रस्ते विकास कामे तातडीने सुरू करण्याची आवश्यकता आहे. वन विभागाकडून आवश्यक परवानग्या मिळवून कामे गतीमान करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी समन्वय साधावा, अशी सूचना देण्यात आली. उमरखेड तालुक्यातील जवराळा, परोटी व संगम चिंचोली गावांच्या पुनर्वसन प्रक्रियेबाबत सविस्तर आढावा घेतला गेला. प्रलंबित बाबी, नागरिकांना आवश्यक सुविधा व पुनर्वसनाची गती वाढविण्यावर भर देण्यात आला.

शासकीय गोदामासाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देणे, टेंभी येथील फळबाग प्रकल्पाची अंमलबजावणी, इको सेन्सिटिव्ह व नो मायनिंग झोनमधील रस्ते विकास, तसेच तिवरंग येथील पुलासाठी जमिनीच्या निवाडा प्रक्रियेसंदर्भातील प्रलंबित बाबी यावर देखील चर्चा करण्यात आली.

पांदण रस्त्यांच्या विकासासाठी अतिक्रमणे हटवणे व रस्त्यांच्या कडेला आंबा, चिंच, जांभूळ व चंदन यांसारख्या वृक्षांची लागवड करण्याची सूचना देण्यात आली.

पंचायत समिती अंतर्गत सुरू व प्रलंबित विविध विकास कामांचा एकत्रित आढावा घेऊन प्रगती, अडथळे व उपाययोजना यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीस जिल्हाधिकारी विकास मीना तसेच जिल्हा समन्वयक नितीन भुतडा उपस्थित होते.

# अवैध रेतीचा उपसा जोमात; शासन नियमांना हरताळ

## एकाच पावतीवर अनेक फेऱ्या; घरकुल लाभार्थ्यांचा कोटा वळवण्याचे आरोप

प्रतिनिधी ९ एप्रिल





**उमरखेड :** तालुक्यातील विविध रेती घाटांवर सध्या अवैध रेती उपसा मोठ्या प्रमाणात सुरू असून शासनाने घालून दिलेल्या नियमांची सर्रास पायमल्ली होत असल्याचे चित्र समोर येत आहे. एकाच पावतीवर दिवसभरातून अनेक ट्रिप मारणे, आवक-जावक नोंदी न ठेवणे तसेच घरकुल लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काची रेती नाकारणे असे गंभीर प्रकार उघड होत आहेत.

शासकीय नियमानुसार प्रत्येक ट्रिपसाठी स्वतंत्र पावती आवश्यक असताना, अनेक घाटांवर एकाच पावतीचा वापर करून दहा-दहा फेऱ्या मारल्या जात असल्याचे आढळून येत आहे. त्यामुळे शासनाचा मोठ्या प्रमाणात महसूल बुडत असल्याचा आरोप केला जात आहे. तसेच रेती साठ्याचा हिशोब ठेवण्यासाठी आवश्यक असलेली 'आवक-जावक' नोंद अनेक ठिकाणी अस्तित्वात नसल्याचे समोर आले आहे. दरम्यान, घरकुल योजनेतील लाभार्थ्यांसाठी राखीव असलेला २५ टक्के रेती साठा देखील प्रत्यक्षात उपलब्ध होत नसल्याच्या तक्रारी आहेत. माफियांच्या दबावामुळे हा साठा वळवून चढ्या दराने विक्री केली जात असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे गरजू लाभार्थी वाऱ्यावर पडले आहेत. या सर्व प्रकारावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी महसूल विभाग व उपविभागीय अधिकारी कार्यालयाची असताना, प्रत्यक्षात कोणतीही प्रभावी तपासणी होत नसल्याचे दिसून येते. तपासणी पथकांचा अभाव असून कारवाई केवळ कागदोपत्रीच मर्यादित असल्याची टीका होत आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी स्तरावरून या प्रकरणाची दखल घेऊन संबंधित अधिकारी व रेती कंत्राटदारांवर कठोर कारवाई होणार का, याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# पं. दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण अभियानांतर्गत भाजपची निवासी कार्यशाळा

प्रतिनिधी ९ एप्रिल



**यवतमाळ :** भारतीय जनता पार्टीच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या पं. दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियानांतर्गत यवतमाळ शहर दक्षिण मंडळाची दोन दिवसीय निवासी कार्यशाळा उत्साहात पार पडली. स्थानिक केमिस्ट भवन येथे आयोजित या कार्यशाळेत पक्षाच्या विविध पदाधिकाऱ्यांचा सक्रिय सहभाग नोंदविण्यात आला.

कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी नगराध्यक्षा प्रियदर्शनी उईके, गटनेते व शहर मंडळ अध्यक्ष नितीन गिरी, उपाध्यक्ष दत्ता कुलकर्णी, सरचिटणीस राजू पडगिलवार, जिल्हा कार्यालय प्रभारी शंतनू शेटे आदी मान्यवर उपस्थित होते.

या सत्रांमध्ये जिल्हाध्यक्ष ॲड. प्रफुल चव्हाण, राजू पडगिलवार, विजय खडसे, प्रलय टिप्रमवार, प्रा. डॉ. नितीन खर्चे, सतीश मानलवार तसेच नगरसेविका कीर्ती राऊत यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेचा समारोप माजी मंत्री मदन येरावार यांच्या उपस्थितीत झाला. या कार्यशाळेत शहर कार्यकारिणी सदस्य, विविध आघाड्यांचे पदाधिकारी, नगरसेवक, शक्ती केंद्रप्रमुख व बूथ प्रमुख यांनी प्रशिक्षणार्थी म्हणून सहभाग घेतला. महिला प्रशिक्षणार्थींसाठी गोधडीवाला धाम येथे निवासाची व्यवस्था करण्यात आली होती.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शहराध्यक्ष नितीन गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली अभिषेक श्रीवास, प्रशांत देशमुख, पुष्पलता सप्रे, स्वप्निल उलंगवार, श्रीराम मिल्केवार, पंकज नानवाणी आदींसह कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# सिटी न्यूज अमरावती

गुरुवार, दि. ९ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


## स्पर्धेच्या युगात कौशल्ययुक्त व जबाबदार पिढी घडवण्यासाठी भारतीय ज्ञानपरंपरेचा अभ्यास आवश्यक - डॉ. श्रीराम कावळे

**दर्यापूर :** आपल्या भारताला देशाला गौरवशाली ज्ञानपरंपरेचा समृद्ध वारसा आहे. नवीन शैक्षणिक धोरण २०२० मध्ये भारतीय परंपरा, मूल्ये, भाषा, संशोधन आणि कौशल्याधारित शिक्षणाला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. वेद, उपनिषद, योग, आयुर्वेद, गणित, खगोलशास्त्र, तत्त्वज्ञान आणि समृद्ध जीवनमूल्ये असलेली भारतीय ज्ञान प्रणाली ही आपल्या शिक्षणाचा मजबूत पाया आहे. आजच्या जागतिक स्पर्धेच्या युगात केवळ माहिती नव्हे तर संस्कारयुक्त, संशोधनशील आणि जबाबदार नागरिक घडवण्यासाठी या ज्ञानपरंपरेचा अभ्यास अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीचे प्र-कुलगुरू डॉ.श्रीराम कावळे यांनी केले. ते श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित जे.डी.पाटील सांगळूदकर महाविद्यालयात भारतीय ज्ञान प्रणाली या विषयावर आयोजित राष्ट्रीय परिषदेमध्ये उद्घाटक व मुख्य अतिथी म्हणून बोलत होते.

## उस्मानिया मज्जिद परिसरात ट्रान्सफार्मरला आग

### ◆ अग्निशमन दलाच्या तत्परतेने मोठे नुकसान टळले

प्रतिनिधी ९ एप्रिल

**अमरावती :** शहरातील उस्मानिया मज्जिद, बस स्टॅन्ड रोड परिसरात बुधवारी (दि. ८ एप्रिल २०२६) दुपारी ट्रान्सफार्मरला आग लागल्याची घटना घडली. अग्निशमन दलाच्या जलद आणि तत्पर कारवाईमुळे मोठे नुकसान टळले असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

दुपारी ०४.०३ वाजताच्या सुमारास अग्निशमन मुख्यालय नियंत्रण कक्ष (१०१) येथे सुमित दिलीपराव बेलसरे यांनी फोनद्वारे माहिती दिली की उस्मानिया मज्जित जवळील इलेक्ट्रिक ट्रांसफार्मर डीपीला आग लागली आहे. तसेच प्रशांत नगर उपकेंद्र येथील पाळी प्रमुख मनोज इंगोले यांनीही ही माहिती दिली.



माहिती मिळताच पाळी प्रमुख व केंद्रप्रमुख यांच्या आदेशानुसार फायर लॉरी क्रमांक Mh 27& BW 7506 तात्काळ घटनास्थळी रवाना करण्यात आली. वाहन चालक सारंग राठोड व राजू शेंडे तसेच लिडीग फायरमॅन विशाल भगत आणि प्रशांत गोळे यांनी घटनास्थळी पोहोचून आग विझवण्याचे काम सुरू केले.

घटनास्थळी पोहोचल्यावर कचऱ्यामुळे MSEB ट्रांसफार्मरने पेट घेतला होता. याच आगीमुळे जवळ उभ्या असलेल्या Mh 27 DL 6158 क्रमांकाच्या टाटा पंच कारलाही आग लागली होती. त्या वेळी विद्युत प्रवाह सुरू असल्याने तत्काळ शर्एँ कंट्रोल रूमला माहिती देण्यात आली. त्यानंतर अग्निशमन दलाने योग्य खबरदारी घेत आगीवर नियंत्रण मिळवले.

अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे टाटा पंच कारचे मोठे नुकसान टळले. या घटनेत सुमारे २ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला असून सुमारे ७ लाख रुपयांचे नुकसान वाचवण्यात यश आले.ष्घटनेची माहिती मिळताच अग्निशमन अधीक्षक अजय पंधरे यांनी घटनास्थळी धाव घेऊन परिस्थितीचा आढावा घेतला. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नाही किंवा कुणीही जखमी झाले नाही.

या कारवाईत अग्निशमन अधीक्षक अजय पंधरे, वाहन चालक सारंग राठोड, राजू शेंडे तसेच लिडीग फायरमॅन विशाल भगत, प्रशांत गोळे इत्यादींचा सहभाग होता.

## उत्साहात साजरी होणार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १ ३ ५ वी जयंती

### ◆ अभिवादन सोहळ्यासह व्याख्यान व गौरव पुरस्कारांचे आयोजन

प्रतिनिधी ९ एप्रिल

**अमरावती :** महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १४ एप्रिल जयंतीनिमित्त अमरावती येथे यंदाही भव्य अभिवादन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे सर्व धर्मिय व सर्व पक्षिय नागरिकांच्या सहभागातून हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडणार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा सौदर्याकरण समितीच्या वतीने गेल्या १५ वर्षांपासून हा जयंती उत्सव सातत्याने साजरा केला जात आहे.

यंदा भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर प्रसिद्ध विचारवंत व वक्ते संजय आवटे यांचे विशेष



व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. तसेच समाजात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवनगौरव, जीवन संघर्ष, कर्तव्यपुर्ती व कर्तव्यदक्ष' पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. या अभिवादन सोहळ्यास पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे विभागातील सर्व सन्माननिय लोकप्रतिनिधी, जेष्ठ मान्यवर, जिल्हाधिकारी तसेच विविध विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत. यंदा कडक उन्हाचा विचार करून कार्यक्रम सकाळी ९.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जागतिक स्तरावर स्वीकार झाला असून, कोलंबिया विद्यापीठाने जगातील १०० विद्वानांच्या यादीत त्यांना प्रथम क्रमांक दिला असल्याचे गौरवपूर्ण उदाहरणही यावेळी नमूद करण्यात आले. त्यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या अमरावती शहरात हा जयंती उत्सव साजरा होत असल्याने सर्व स्तरातून मोठा प्रतिसाद मिळत आहे. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी ॲड. दिलीप एडतकर, ॲड. पी.एस. खडसे, प्राचार्य गोपीचंद मेश्राम, डॉ. बी.आर. देशमुख, प्रा. जगदिश गोवर्धन, प्रा. अनिल देशमुख, भैय्यासाहेब निचळ, राजाभाऊ चौधरी, वैभव देशमुख, रमेश रामटेके, समिर जवंजाळ हे सक्रिय सहभाग घेत आहेत.

सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून जयंती उत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन समन्वयक किशोर बोरकर यांनी पत्रकार परिषदेत केले आहे.

## समाज कल्याण विभागामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहाला सुरवात

प्रतिनिधी ९ एप्रिल

**अमरावती:** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती सर्वसामान्य जनतेला व्हावी आणि जनजागृती व्हावी, या उद्देशाने प्रत्येक जिल्ह्यात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह साजरा करण्यात येत आहे. या सप्ताहाला ८ एप्रिलपासून सुरवात झाली असून हा सप्ताह १४ एप्रिल २०२६, पर्यंत चालणार आहे. सप्ताहा दरम्यान विविध कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन, वक्तृत्व आणि निबंध स्पर्धा, पथनाट्ये, कार्यशाळा, मेळावे आणि व्याख्यानांचा यात समावेश आहे. शासकीय योजनांची माहिती जास्तीत-जास्त लोकांपर्यंत पोहोचवणे आणि सामाजिक समता, न्याय व बंधुता या मूल्यांना प्रोत्साहन देणे हा या सप्ताहाचा मुख्य उद्देश आहे. सप्ताह दरम्यान, जिल्हाभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. ९ एप्रिल रोजी शाळा, महाविद्यालये आणि शासकीय वसतिगृहांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित वक्तृत्व, निबंध आणि लघुनाटिका स्पर्धा आयोजित केल्या जातील. तसेच संत गाडगे महाराज यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त संत गाडगे महाराज यांच्या कार्याचे महत्व प्रतिपादन करणारे व्याख्यानं, वक्तृत्व स्पर्धा इत्यादिचे आयोजन करणे, याच दिवशी, जिल्हा आणि विभागीय स्तरावर शासकीय योजनांच्या लाभांचे प्रातिनिधिक स्वरूपात लाभार्थ्यांना वितरण करण्यात येणार आहे.

१० एप्रिल रोजी समतादूतांद्वारे ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये पथनाट्ये आणि लघुनाटिकांच्या माध्यमातून सामाजिक न्याय विभागाच्या योजनांविषयी प्रबोधन केले जाईल. तसेच मार्जिन मनी योजनेवर कार्यशाळा आणि लाभार्थी मेळावे आयोजित केले जातील. ११ एप्रिल रोजी क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात येणार असून त्यांच्या सामाजिक कार्यावर व्याख्यान आयोजित केले जाईल. जेष्ठ नागरिकांचे मेळावे, शाळा वसतीगृह व महाविद्यालयांमध्ये आरोग्य तासणी व रक्तदान शिबीरांचे आयोजन करणे. दि.१२ एप्रिल रोजी सप्ताहामध्ये 'संविधान जागर' कार्यक्रमांतर्गत भारतीय संविधानाची निर्मिती, मूलभूत अधिकार आणि कर्तव्ये यावर माहिती दिली जाईल. महिलांसाठी विशेष मेळावे आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी जनजागृती शिबिरे व मेळाव्याचे आयोजित करण्यात येणार आहेत. १३ एप्रिल रोजी प्रत्येक जिल्ह्यात जनजागृती शिबीर व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येणार असून, शासकीय कार्यालये आणि अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्त्यांमध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. तसेच जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यालयात ऑनलाईन जात पडताळणी प्रमाणपत्रे वितरित केली जाणार आहेत. १४ एप्रिल रोजी सप्ताहाचा समारोप होईल. यानिमित्त, शासकीय कार्यालये, शाळा आणि महाविद्यालयांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन कार्यक्रम, विविध व्याख्याने आणि चर्चासत्रांचे आयोजन करण्यात येईल. तसेच विविध व्याख्याने आणि चर्चासत्रांचे आयोजन करण्यात येईल. जिल्हा स्तरावर कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान मेळावा आयोजित करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतकऱ्यांसाठी केलेल्या कार्यावर माहिती देण्यात येईल. तसेच महाडच्या चवदार तळे सत्याग्रहाचे शताब्दि वर्ष म्हणून दि.२० मार्च २०२६ पासून साजरे करण्यात येत असून त्यानिमित्ताने चवदार तळे महाड येथील सत्याग्रहासंबंधी व त्याअनुषंगाने मानवी हक्कांचे महत्व प्रतिपादन करणारे व्याख्यान आयोजित केले जाईल.

## आशा भरतीतील कथित गैरप्रकाराविरोधात उपोषण

### दीपाली सूरज हजारे यांचा सहा महिन्यांच्या बाळासह न्यायासाठी लढा

प्रतिनिधी ९ एप्रिल

**अमरावती :** वलगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात दिनांक ६ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या आशा सेविका भरती प्रक्रियेत गंभीर गैरप्रकार झाल्याचा आरोप करण्यात आला असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

या पार्श्वभूमीवर, न्याय मिळवण्यासाठी दीपाली सूरज हजारे हे आपल्या सहा महिन्यांच्या बाळासह जिल्हा परिषद आरोग्य विभाग कार्यालयासमोर उपोषणाला बसले आहेत. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर



प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दीपाली सूरज हजारे यांचा आरोप आहे की, आशा भरती प्रक्रियेत पारदर्शकता ठेवण्यात आली नाही आणि नियमबाह्य पद्धतीने उमेदवारांची निवड करण्यात आली. पात्र उमेदवारांना डावलण्यात आल्यामुळे ही भरती रद्द करून जुन्या निकषांनुसार पुन्हा प्रक्रिया राबवावी, अशी त्यांची मागणी आहे. तसेच, संबंधित वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तात्काळ निलंबनाची कारवाई करून संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. दरम्यान, या उपोषणामुळे प्रशासनावर दबाव वाढत असून, नागरिकांकडूनही या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन योग्य निर्णय घेण्याची मागणी होत आहे.

## जिल्हाधिकारी कार्यालयातच बेशिस्तीची पार्किंग व्यवस्था

### ◆ नागरिक त्रस्त, शिस्त कधी लागणार?

प्रतिनिधी ९ एप्रिल

**अमरावती :** जिल्ह्यातील विविध शासकीय विभागांवर नियंत्रण ठेवणाऱ्या जिल्हाधिकारी कार्यालयातच सध्या बेशिस्त पार्किंग व्यवस्था निदर्शनास येत आहे. यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. रोज मोठ्या संख्येने नागरिक विविध कामांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात येत असतात. याशिवाय वर्किंग वेळेत विविध संघटना आणि गटांचे मोर्चेही येथे येत असल्याने परिसरात मोठी गर्दी निर्माण होते.

या पार्श्वभूमीवर कार्यालय परिसरात अधिकृत पार्किंग व्यवस्था उपलब्ध असतानाही



अनेक नागरिक नो -पार्किंग झोनमध्ये आपली वाहने उभी करत असल्याचे चित्र दिसून येत आहे. परिणामी, इतर वाहनधारकांना आपली वाहने बाहेर काढताना मोठी कसरत करावी लागते. अनेक वेळा वाहनांच्या गर्दीतून मार्ग काढताना अक्षरशः तारेवरची कसरत करावी लागत असल्याने नागरिक संतप्त होत आहे.

विशेष म्हणजे, जिल्ह्यातील सर्व विभागांवर नियंत्रण ठेवणाऱ्या जिल्हाधिकारी कार्यालयातच अशी अव्यवस्था असल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर कारवाईचा बडगा उगारून पार्किंग व्यवस्था सुधारतील का? असा प्रश्न केला जात आहे.?

कार्यालयातील कर्मचाऱ्यांनाही अडचणींचा सामना करावा लागत आहे. पार्किंग व्यवस्थेवर कडक नियंत्रण ठेवून नो पार्किंगमध्ये वाहन उभे करणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. एकूणच, नागरिकांची वाढती गैरसोय लक्षात घेता जिल्हाधिकारी कार्यालय प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना करून परिसरात शिस्त प्रस्थापित करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

## पी. आर. पोटे पाटील अभियांत्रीकीच्या विद्यार्थ्यांना सीओईपीच्या भाऊ फौंडेशनमध्ये सर्वोत्तम म्हणून पारितोषिके

प्रतिनिधी ९ एप्रिल

**अमरावती :** कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुणे ( सीओईपी) येथे भाऊ फौंडेशनच्यावतीने आयोजित राष्ट्रीय स्तरावरील इग्रेटर इनव्होटर ऑफ इंडिया या स्पर्धेत स्थानिक पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयातील विविध विभागातील विधार्थ्यांनी एक प्रथम, एक सर्वोत्तम आणि एक इनोव्हेटिव्हमध्ये सर्वोत्तम पारितोषीक असे सर्व मिळून ३ पारितोषिके पटकावून सुयश प्राप्त केले.

पुणे येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, टेकनॉलॉजिकल विद्यापीठ, पुणे याचे भाऊ फाऊंडेशनच्यावतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असते. हि प्रोजेक्ट स्पर्धा एकून ५ स्तरांमधून होत असते, प्रत्येक स्तरातील प्रत्येक फेरी एलिमिनेशन फेरी होती यामध्ये संपूर्ण भारतातून अनेक अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थी आपल्या नवनवीन संकल्पना आणि प्रतिकृती मधून मांडत असतात. ही स्पर्धा दि. २४ व २५ मार्च २०२६ रोजी सीओईपीच्या भाऊ फौंडेशनमध्ये आयोजित करण्यात आली असता पी. आर. पोटे पाटील महाविद्यालयातील एकूण ०५ चमूंनी भारतातील टॉप ३० संकल्पना मध्ये सहभाग नोंदविला होता. ज्यामध्ये १) स्मार्ट योगामॅट फॉर प्रॉपर योगसाधना २) नवजात बालकांच्या लसीकरणासाठी वेळेवर स्मरणपत्रांसह डिजिटल केअरचा प्रभावी वापर ३)पाथफाइंडर: अभियांत्रिकी संधींचे भाकीत ४) कोशफिन (योजना आणि गृह वित्त विषयक ज्ञान): भारताच्या सूक्ष्म अर्थव्यवस्थेला सक्षम करणे ५) फ्लोट अँड फ्लो : ग्रीन एनर्जी ग्रिड यांचा समावेश होता. या सर्वामधून महाविद्यालयाने सर्व सेक्टरमधून एकूण ३ पारीतोषिक प्राप्त केली. दरम्यान संपूर्ण महाराष्ट्रातून प्रथम म्हणून एन्ट्रप्रेनर सेक्टर मध्ये चि. आदित्य सदाफळे आणि कू. मनस्वी वानखडे, इलेक्ट्रॉनिक्स आणि दूरसंचार अभियांत्रिकी यांनी पारितोषिक मिळवले व इनोव्हेटिव्ह कॉन्सेप्ट बाय इंनोवेटर कॉलेज म्हणून पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, अमरावती यांना संपूर्ण महाराष्ट्रातून सवौत्तम कामगिरी करणारे महाविद्यालय म्हणून गौरवण्यात आले. सर्व ६ क्षेत्रांमधील सर्वोत्कृष्ट सर्वांगीण प्रकल्प म्हणून एचएचएच सेक्टरमध्ये चि. वेदांत जांभळीकर, चि. विशाल जांभेकर, चि. ललित भाडे, चि. यश साखरकर यांनी संगणक अभियांत्रिकी (एआयएमल) चमूला पारितोषिक मिळाले.

## हवामान अनुकूल शेतीसाठी जिल्ह्यात 'डिजिटल शेतीशाळा'

### तज्ज्ञांमार्फत शेतकऱ्यांना शास्त्रोक्त मार्गदर्शन

प्रतिनिधी ९ एप्रिल

**अमरावती:** मागील काही वर्षांत हवामानातील बदलामुळे निर्माण झालेली पावसाची अनिश्चितता, पावसातील खंड, मान्सूनचे उशिरा आगमन आणि गारपीट यांसारख्या आव्हानांचा सामना करण्यासाठी शेतीला आता आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिली जाणार आहे. राज्य शासनाने जागतिक बँकेच्या सहाय्याने सुरू केलेल्या 'नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प २.०' (इदर्पें) अंतर्गत, अमरावती जिल्ह्यासह राज्यातील २१ जिल्ह्यांमध्ये 'हवामान अनुकूल तंत्रज्ञान अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानाचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणून पाणी फाउंडेशनच्या सहकार्याने येत्या एप्रिल २०२६ मध्ये विशेष 'डिजिटल शेतीशाळा' आयोजित करण्यात आल्या आहेत.

पाणी फाउंडेशनद्वारे संचालित ही डिजिटल शेतीशाळा झूम आणि यूट्यूब यांसारख्या ऑनलाईन माध्यमांतून चालविली जाणार आहे, जिथे तज्ज्ञांमार्फत शेतकऱ्यांना पीकनिहाय शास्त्रोक्त मार्गदर्शन मिळेल. या नियोजित शेतीशाळांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून, सर्व सत्रे सायंकाळी ७:३० वाजता सुरू होतील. यामध्ये प्रामुख्याने १ एप्रिल रोजी पेरणीपूर्व तंत्रज्ञान, बेड तयार करणे आणि बीज प्रक्रिया यावर चर्चा होईल. त्यानंतर ८ एप्रिल रोजी बीजामृत, जीवामृत व दशपर्णी अर्क यांसारख्या जैविक निविष्ठा उत्पादनाचे धडे दिले जातील, तर १५ एप्रिल रोजी एकात्मिक कीड व्यवस्थापन, सापळा पिके आणि मित्रकिडींचा वापर या विषयावर तज्ज्ञ मार्गदर्शन करतील.

या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना घरबसल्या प्रगत तंत्रज्ञान शिकता येणार असून, खते आणि कीडनाशकांचा खर्च कमी करून उत्पादकता वाढवणे शक्य होणार आहे. हवामानानुसार पेरणीचे अचूक नियोजन आणि तज्ज्ञांशी थेट संवाद साधण्याची ही सुवर्णसंधी असल्याचे प्रकल्प संचालकांनी नमूद केले आहे. तरी, जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधव, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि महिला बचत गटांनी या डिजिटल शेतीशाळेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन 'आत्मा' प्रकल्प संचालक अर्चना निस्ताने यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी आपल्या गावातील सहाय्यक कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.

## लाखो रूपयांच्या थकीत बिलामुळे रुग्णवाहिकांचे डिझेल बंद

### मेळघाटातील आरोग्य यंत्रणा व्हेंटिलेटरवर

जयकिसन इंगळे ९ एप्रिल

**धारणी:** कुपोषणाच्या विळख्यात असलेल्या मेळघाटातील आरोग्य यंत्रणेचा मोठा धिंडवडा निघाला आहे. तालुका आरोग्य विभागाकडे डिझेलची तब्बल ३१ लाख ६१ हजार रुपयांची देयके थकीत असल्याने, परतवाडा येथील अथर्व सर्व्हा परतवाडा सेंटरने डिझेल पुरवठा पूर्णपणे बंद केला आहे.परिणामी, दुर्गम भागातील रुग्णवाहिकांची चाके जागीच रुतली असून, आदिवासी रुग्णांचे हाल होत आहेत. विशेष म्हणजे, माजी आरोग्यमंत्री डॉ. दीपक सावंत यांच्या दौऱ्याच्या तोंडावरच हा प्रकार उघडकीस आल्याने प्रशासनाची मोठी धावपळ उडाली आहे. टास्क फोर्सचे अध्यक्ष डॉ. दीपक सावंत हे मेळघाट दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्यासमोर आरोग्य विभागाचा हा सावळागोंधळ उघडा पडू नये, यासाठी आता वरिष्ठ अधिकाऱ्यांनी हालचाली सुरू केल्या आहेत. पत्रावर अधिकाऱ्यांनी तातडीने वाहननिहाय हिशोब पडताळून पाहण्याचे आदेश दिले आहेत.



सेमाडोह, सलोना आणि टेंबुसोंडा यांसारख्या भागात रुग्णवाहिका हीच आदिवासींसाठी संजीवनी असते. मात्र, डिझेल नसल्याने ऐनवेळी रुग्णवाहिका न मिळाल्यास एखाद्याचा जीव गेल्यास जबाबदार कोण? असा मेळघाटातून संतप्त सवाल विचारला जात आहे. आरोग्य विभागाची रुग्णवाहिका तसेच इतर संबंधित वाहनांचा इंधन पुरवठा बंद झाल्यास मेळघाटात आरोग्यसेवा कोलमडणार असल्याच वास्तव आहे. तर हा प्रकार गंभीर ठरणारा आहे. पेट्रोल पंपाच्या संचालकांनी १ एप्रिल २०२६ रोजी तालुका आरोग्य अधिकाऱ्यांना पत्र देऊन डिझेल पुरवठा बंद करण्याचा इशारा दिला होता. पत्रात नमूद केल्यानुसार, मागील अनेक दिवसांपासून ३१ मार्च २०२६ पर्यंतची ३१,६१,०५१ रुपयांची देयके प्रलंबित आहेत. वारंवार विनंती करूनही निधी मिळत नसल्याने व्यवसाय चालवणे कठीण झाल्याचे संचालकांनी म्हटले आहे. जोपर्यंत थकीत रकमेची पूर्ण वसुली होत नाही तो पर्यंत डिझेल देण्यासाठी पूर्ण पने नकार देण्यात आला आहे. प्रशासन यावर काय निर्णय घेणार या कडे मेळघाटवासीयांचे लक्ष लागलेले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

गुरूवार दि ९ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


पोलीस विभाग अचंबित, पि.एस.आय.सुनील गिरी निलंबित !

पैशाचा खेळ, कोण लावत होता मेळ !

## पीएसआय गिरी प्रकरण...

# पडद्यामागे घडलंय काहीतरी खास, संशयाच्या भोवऱ्यात सुरू होता तपास !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशीम शहर पोलीस ठाण्यातील पीएसआय सुनील गिरी यांच्यावर झालेल्या गंभीर आरोपांमुळे त्यांना निलंबित करण्यात आले आहे. मात्र ज्या प्रकरणात त्यांना निलंबित करण्यात आले.त्या गुन्ह्याच्या तपासावर आता संशयाचे सावट निर्माण झाले आहे. तक्रारीतील अनेक दाव्यांमध्ये संशय आढळत असून पीएसआय गिरी यांच्यावरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.दरम्यान दै. सिटीन्यूज सुपरफास्टने गिरी यांच्या कथित कारनाम्यांचे वृत्त प्रसारित केल्यानंतर जिल्ह्याभरात त्यांच्या विरोधात संतापाची लाट उसळली आहे.पीएसआय गिरी यांच्या वागणुकीमुळे पोलिसांची प्रतिमा मलिन होत असून त्यांचे केवळ निलंबन पुरेसे नसून आता त्यांना थेट सेवेतून बडतर्फ करण्याची मागणी जोर धरत आहे.



वाशिम शहर पोलीस ठाण्यात दि. ०३ फेब्रुवारी २०२६ रोजी आपसी वादातून दाखल झालेल्या गुन्ह्याच्या तपासावर आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणात तीन आरोपींसह अज्ञात चार जणांविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास पीएसआय गिरी यांच्याकडे सोपवण्यात आला होता.तक्रारीनुसार, आरोपींनी फिर्यादीवर तलवारीने हल्ला करून गंभीर दुखापत केली, तसेच खंडणी मागत रोख रक्कम आणि सोन्याची गंठन लुटल्याचे आरोप करण्यात आले आहेत.

***गिरी यांनी सांगितल्या प्रमाणे तक्रार दिली गेली .**
*** आणखी धक्कादायक माहिती समोर येणार.**

याशिवाय आरोपी थार गाडीतून आले होते, असा उल्लेखही तक्रारीत आहे. मात्र, या सर्व आरोपांमध्ये तथ्य नसल्याचा संशय व्यक्त केला जात असून संपूर्ण प्रकरणात पडद्यामागे काहीतरी वेगळेच घडल्याची चर्चा सुरू आहे.फिर्यादीने तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे मुद्दा क्र.१) आरोपी हा फिर्यादीला वारंवार पैसे देण्याची मागणी करत होतं.पैसे नाही दिले तर तुला सोडणार नाही अशी धमकी देत होता. मात्र जर असे खरोखरच होत असेल तर यापूर्वी फिर्यादीकडून खंडणीबाबत कोणतीही तक्रार का दाखल करण्यात आली नाही, हा प्रश्न उपस्थित होत आहे.मुद्दा क्र.२)फिर्यादीवर तलवारीने हल्ला झाल्याचा दावा करण्यात आला असतांना तपासादरम्यान आरोपीकडून कोणतीही तलवार जप्त करण्यात आलेली नाही. यामुळे या दाव्याच्या सत्यतेवर संशय निर्माण झाला आहे.मुद्दा क्र.३) फिर्यादीच्या केबिनमधून ४० हजार रुपये आणि पाच तोळ्याची सोन्याची गंठन लुटल्याचे म्हटले आहे. मात्र, तपासात ही सोन्याची गंठन किंवा रोख रक्कम जप्त करण्यात आली नसल्याने यावर प्रश्न उपस्थित होत आहेत .मुद्दा क्र.४)पुढे सर्व आरोपी थार गाडीतून आले व त्याच गाडीतून पळून गेल्याचे स्पष्टपणे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.जेव्हा गुन्ह्यात गाडी वापरली गेली होती.तर आरोपीसह थार गाडी सुद्धा गिरी यांनी ताब्यात घेतली होती. आणि ही गाडी तब्बल ३० दिवस पोलीस ठाण्यातच उभी होती.तर ती जप्त का दाखविण्यात आली नाही. ही बाब अधिकच धक्कादायक मानली जात आहे.घडलेल्या या संशयास्पद बाबींमुळे तपास अधिकारी गिरी यांच्या कामकाजावर प्रश्न उपस्थित होत आहेत. तपासात झालेल्या त्रुटी व जप्ती न झालेल्या मुद्द्यांमुळे ते या प्रकरणात पूर्वीपासूनच सहभागी असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.




त्यामुळे तपासा दरम्यान पडद्यामागे घडलंय काही तरी खास,म्हणूनच संशयाच्या भोवऱ्यात सुरू होता गुन्ह्याचा तपास अशी चर्चा सुरू आहे. आता या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी पीएसआय गिरींना बडतर्फ करण्याची मागणी होत आहे.

# सुविधाचा सेतू, लूटण्याचा हेतू !

*** सेतू केंद्रावर भर उन्हात हेलपाटे, शेतकरी संतप्त.**
*** शासनाच्या सातबारा संकेतस्थळावर 'एरर'.**

● दिपक मापारी @ कवठा ●

तालुक्यातील शेतकऱ्यांना सध्या शासनाच्या सातबारा ७/१२ उत्तरासाठी मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत नाही. ऑनलाइन प्रणाली मध्ये वारंवार एरर येत असल्यामुळे सेतू केंद्रावर अक्षरशः बट्ट्या बोळ झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

शेतकऱ्यांना कर्ज भरणे तसेच नवीन पिक कर्ज घेण्यासाठी सातबारा उतारा अत्यावश्यक असल्याने, या कागदपत्रासाठी त्यांची सेतू केंद्राकडे मोठ्या प्रमाणात धावपळ सुरू आहे. मात्र संकेत स्थळ नीट कार्यरत नसल्यामुळे तसं तास प्रतीक्षा करूनही शेतकऱ्यांच्या हाती काहीच लागत नसल्याने त्याचा संताप अनावर होत आहे.सेतू केंद्र चालकांनाही या तांत्रिक बिघाडीचा मोठा फटका बसत असून, नागरिकांच्या रोषाला त्यांनाच सामोरे जावे लागत आहे. सर्व प्रक्रिया ऑनलाईन असली तरी सिस्टीमत डाऊन असल्यामुळे काम करणे अशक्य झाले आहे. अशी प्रतिक्रिया रिसोड मधील काही सेतू चालकांनी व्यक्त केली आहे. दरम्यान पेरणी हंगामाच्या पार्श्वभूमीवर कर्जत केलेला गती देणे गरजेचे असताना सातबारा मिळण्यात अडथळे निर्माण होत असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नियोजन कोलमडयाची भीती व्यक्त केली जात आहे.संबंधित महसूल व आयटी विभागाने या गंभीर समस्या कडे तातडीने लक्ष देऊन संकेत स्थळातील तांत्रिक त्रुटी दूर कराव्यात. तसेच सेतू केंद्रावरील कामकाज सुरळीत करावे, अशी मागणी शेतकरी वर्गातून जोर धरत आहे. ऑनलाइन सेवा नावालाच प्रत्यक्षात मात्र शेतकऱ्यांची फरकट अशी संतप्त प्रतिक्रिया सर्वत्र उमटत आहे. यासह तांत्रिक अडचणी या नेत्याव्याच बनल्या असून सेतू केंद्रावर कुठलेही धड काम होत नसल्याने ऑनलाइन प्रणालीवर मोठ्या प्रमाणात प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना व शेतकऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

पिककर्ज भरण्यासाठी शेतकऱ्यांना सातबारा हा अत्यंत महत्त्वाचा दस्तावेज असून पीक कर्ज भरण्यासाठी तो आवश्यक आहे. मात्र सेतू केंद्रावरील नित्याच्या तांत्रिक अडचणी मुळे शेतकऱ्यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. शासनाने ही समस्या तातडीने सोडवून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. तसेच सेतू केंद्राच्या सुविधा विनाविलंब जलद गतीने सोडवाव्या.

**शंकर मोरे**, ग्रामस्थ घोटा

## थोडक्यात

### पॉवर पॉईंट सादरीकरण उपक्रमाचे आयोजन



● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

यशवंतराव चव्हाण आर्ट्स अँड सायन्स महाविद्यालय, मंगरुळपीर येथील उर्दू व फारसी विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २०२५–२६ अंतर्गत पॉवरपॉइंट सादरीकरण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम आदरणीय चंद्रकांतदादा ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल सुर्वे यांच्या प्रमुख नेतृत्वात यशस्वीरीत्या पार पडला.

या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. अंजुम खान व डॉ. सैयद रमीज यांनी केले. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती, आत्मविश्वास, वक्तृत्वकला व तांत्रिक ज्ञानाचा विकास करणे हा होता. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उर्दू साहित्याशी संबंधित विविध विषयांवर सादरीकरणे केली. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीसाठी प्रोत्साहित केले.कार्यक्रमाचा समारोप आभार प्रदर्शनाने करण्यात आला। हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला असून सर्व स्तरांतून त्याचे कौतुक करण्यात आले.

### चुलीचा'धूर;गॅसअभावी वंचितचे 'भाकरी'थापून आंदोलन !



● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●



अशा गगनभेदी घोषणा आणि चुल पेटवून त्यावर भाकरी थापत आज रिसोड तहसील कार्यालयाचा समोर वंचित बहुजन आघाडीच्या आंदोलनाने दणाणून गेला. तालुक्यात गॅस सिलेंडरचा प्रचंड तुटवडा निर्माण झाल्याने संतप्त झालेल्या वंचितच्या कार्यकत्यांनी सोमवारी (६ एप्रिल) अनोख्या पद्धतीने प्रशासनाचा निषेध नोंदवला. विशेष म्हणजे प्रशासकीय उंबरठ्यावर मांडली बूल गेल्या काही दिवसांपासून रिसोड शहर आणि तालुक्यात गैस सिलेंडरच्या पुरवठ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. वारंवार गागणी करूनही सर्वसामान्यांना सिलेंडर मिळत नसल्याने गृहिणोंचे स्वयंपाकघर कोलमडले आहे. या प्रश्नाकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी वंचित बहुजन आघाडीने आक्रगक पवित्रा घेतला, कार्यकर्त्यांनी थेट तहसील कार्यालया समोरच लाकडे जमवून चूल पेटवली.

तहसीलदारांना दिले निवेदन आंदोलनानंतर बंचित बहुजन आघाडीच्या शिष्टमंडळाने तहसीलदार तेजनकर मॅडम यांची भेट घेऊन त्यांना मागण्यांचे निवेदन सादर केले. यावेळी उपस्थित तालुका अध्यक्ष महेश तिडके, जेष्ठ नेते रविंद्र मोरे, गिरिधर शेजुळ, विजय सिरसाट, शालिग्राम पठाडे, माधव हिवाळे, माजी शहराध्यक्ष प्रदिप खंडारे, जियाउर खान, गजानन खंडारे, मंदाताई वाघमारे, मंदाताई धांडे, प्रकाश गवई, कैलास सर्वे, विनोद अंभोरे, अरुण बोरकर, गजानन शिंदे, सदानंद गायकवाड, दत्तराव जुमडे, कैलास पंडित, प्रशांत मोरे, संदिप मोरे, समाधान जमधाडे, गुलाब मस्के, मंगेश राजुरकर, विनोद भगत, जितेंद्र जमदाडे, प्रविण खैरे, धनंजय पंडित, शुभम लेमाडे, शुभम जुमडे, आल्हाट, व आदि पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# नियम व निकषांना मुठमाती, योजनेची सूत्र भ्रष्टांच्या हाती !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यात घरकुल योजनांमध्ये लाचखोरीचे प्रमाण वाढले असून, हप्ते मिळवून देण्यासाठी पंचायत समिती स्तरावरिल अधिकारी व कर्मचारी यांनी अनेक लाभार्थ्यांची आर्थिक पिळवणूक केली असल्याचे स्पष्ट होत आहे. गावपातळीवर सरपंच, उपसरपंच आणि ग्रामसेवक यांना ठराविक कमिशन दिल्याशिवाय पात्र यादीत नाव येत नाही. आणि घरकुल मंजूर झाल्यावर गृह निर्माण अभियंता आणि अधिकाऱ्यांना पैसे दिल्याशिवाय हप्ते मिळत नाहीत. परिणामी गोरगरिबांना मिळणाऱ्या तुटपुंज्या अनुदानातील ३० टक्के पूंजी अधिकारी व पदाधिकारी यांना देण्यातच खर्ची होत असल्याची चर्चा होत आहे. त्यामुळे भ्रष्ट कारभार बळावला असून पात्र लाभार्थ्यांना डावलून बोगस लाभार्थ्यांची घरे भरली जात आहेत. या घोटाळ्यात काही सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, अभियंता आणि पंचायत समितीमधील वरिष्ठ अधिकारी मालामाल झाले आहेत. या गंभीर प्रकाराने जिल्हाभर खळबळ उडवून दिली आहे. मात्र जिल्हा परिषदेचे कर्तव्यदक्ष म्हणून सुपरिचित असलेले मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चव्हाण हे या गंभीर प्रकरणात दखल घेत नाहीत तोपर्यंत घरकुल योजनेतील भ्रष्ट कारभार असाच सुरू राहणार असे बोलले जात आहे.

**घरकुल योजना घोटाळ्याच्या ' विळख्यात '**



पंचायत समितीच्या घरकुल विभागात मोठा भ्रष्टाचार झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मोदी आवास, प्रधानमंत्री आवास आणि रामाई घरकुल योजनेत नियम धाब्यावर बसवून काही लाभार्थ्यांना दुहेरी घरकुल मंजूर करण्यात आल्याचे उघड झाले आहे.नियम स्पष्ट असतानाही एका कुटुंबाला एकच घर देण्याऐवजी काहींना दोन योजनांतून लाभ देण्यात आला आहे. काही ठिकाणी तर पती-पत्नी दोघांनाही स्वतंत्र घर मंजूर करून शासनाच्या नियमांची उघडपणे पायमल्ली करण्यात आली आहे.या प्रकरणात अपात्र लाभार्थ्यांना घरकुल मंजूर झाल्याचेही समोर आले आहे. दलालांच्या माध्यमातून अर्ज मंजूर करून घेण्याची साखळी कार्यरत असल्याचे दिसून येत आहे. 'पैसे दिले तर घरकुल मिळते' अशीच व्यवस्था निर्माण झाल्याचा आरोप नागरिक करत आहेत.खोटी कागदपत्रे, बनावट लाभार्थी आणि चुकीची माहिती देऊन शासनाची दिशाभूल करण्यात आल्याची शक्यता व्यक्त होत आहे. या प्रकारामुळे शासनाच्या निधीचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर झाल्याचे चित्र समोर येत आहे.सर्वात गंभीर बाब म्हणजे, या सर्व प्रकारात संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या संगनमताचा संशय व्यक्त केला जात आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावर दुहेरी मंजुरी होणे हे प्रशासनाच्या नाकर्तेपणाचे लक्षण नव्हे का ? असा प्रश्न उपस्थित होत आहे.दरम्यान, पात्र गरीब कुटुंबे अजूनही घरासाठी प्रतीक्षा करत असताना, अपात्र लाभार्थ्यांना दुहेरी घरकुल मिळत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

या प्रकरणाची तातडीने चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच दुहेरी लाभ रद्द करून शासनाची रक्कम वसूल करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# आंबेडकरी साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी अनंतकुमार जुमडे

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

पद्मश्री, ज्येष्ठ विद्रोही कवी नामदेव ढसाळ साहित्य नगरी परिसर, स्मृतीशेष ज्येष्ठ आंबेडकरवादी कवी, प्रसेनजित ताकसांडे विचार मंच सभागृह, श्री शिवाजी महाविद्यालय वाशीम येथे दिनांक १२एप्रिल २०२६ रोजी राज्यस्तरीय आंबेडकरी साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी वाशीम येथील आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ समाजसेवक , अनंतकुमार केशवराव जुमडे यांची आयोजन समितीच्या वतीने सर्वानुमते निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीमुळे संपूर्ण जिल्ह्यातील मित्र परिवारांकडून तसेच सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या स्नेहमंडळीकडून त्यांचे उत्स्फूर्तपणे स्वागत आणि अभिनंदन होत आहे.



अनंतकुमार केशवराव जुमडे हे गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि शैक्षणिक प्रांतात कार्यरत आहेत.त्यांना हा वारसा त्यांचे आजोबा दलित मित्र, के. एम. जुमडे तसेच त्यांचे वडिल कॅप्टन केशवराव जुमडे यांच्यापासून प्राप्त झाला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या शेड्युल कास्ट फेडरेशनचे त्यांचे आजोबा पदाधिकारी होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या बहिष्कृत भारत या वृतपत्राचे विदर्भ प्रांताचे प्रतिनिधी होते. फुले, शाहू, आंबेडकरांचा वैचारिक, सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक वारसा अनंतकुमार केशवराव जुमडे यांना उज्ज्वल आणि तितक्याच पुरोगामी परंपरेने प्राप्त झाला .

# सासुच्या सेवेचा वारसा, सुनेने दाखविला समाजाला आरसा !

**आ**जच्या 'मी आणि माझे कुटुंब' या संकुचित मानसिकतेच्या काळात, अनेक ठिकाणी सासू-सासरे घराला ओझे वाटू लागतात. किरकोळ कुरबुरींवरून जन्मदात्यांना वृद्धाश्रमाची वाट दाखवणाऱ्या सुनांची संख्या वाढत असताना, वाशिम येथील कांचन कपाले यांनी मात्र सासू-सुनेच्या नात्यातील 'परमार्थ' जपला आहे. स्वतःच्या सासूची एखाद्या पोटच्या मुलीपेक्षाही जास्त सेवा करून त्यांनी समाजासमोर एक असा आदर्श उभा केला आहे, जो आधुनिक पिढीच्या डोळ्यात जळजळीत अंजन घालणारा 'ठरला आहे.

धकाधकीच्या जीवनात नात्यांमधील ओलावा हरवत चालला आहे. अशा वेळी वाशिमच्या या कुटुंबाने जोपासलेली

**संघर्षाला पूर्णविराम : कलयुगात जपले संस्कारांचे लेणे**



मूल्ये ही केवळ एका घरापुरती मर्यादित नसून, संपूर्ण समाजासाठी मार्गदर्शक 'ठरली आहेत. ८५ वर्षीय सासू, कै. शांताबाई रमाकांत कपाले, जेव्हा किडनी, लिव्हर आणि हृदयविकाराने पूर्णपणे अंथरुणाला खिळून होत्या, तेव्हा कांचन यांनी साडेतीन महिने क्षणभरही उसंत न घेता त्यांची शुश्रूषा केली. न तक्रार, न थकवा केवळ निष्काम भक्तीमधे आपल्या आईची सेवा केली. ३५ किलो वजन आणि मल्टी ऑर्गन फेल्युअरकडे झुकलेली प्रकृती असताना, डॉक्टरांनीही 'केवळ सेवा' हाच पर्याय सांगितला होता. अशा कठीण प्रसंगात कांचन यांनी २४ तास डोळ्यात तेल घालून सासूची काळजी घेतली. डायपर बदलणे, शारीरिक स्वच्छता राखणे आणि त्यांना जे अन्न चावता येत नव्हते, ते लिक्विड स्वरूपात मायेने भरवणे हा त्यांचा नित्यक्रम होता. विशेष म्हणजे, या काळात त्यांनी पती धनंजय यांच्याकडे कधीही थकवा व्यक्त केला नाही की कोणतीही तक्रार केली नाही. नात्यांची श्रीमंती हीच खरी संपत्ती! 'सून जेव्हा मुलीच्याही पलीकडे जाऊन सासूची सेवा करते, तेव्हा त्या घरात देवपण नांदते,' हेच कांचन यांनी आपल्या कृतीतून सिद्ध केले. आज अनेक सुना सासूला 'प्रतिस्पर्धी' मानतात, पण कांचन यांनी सासूमध्ये आपली 'आई' पाहिली. त्यांनी दिलेला हा संदेश आजच्या चंगळवादी समाजासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. केवळ भौतिक सुख आणि संपत्तीची श्रीमंती न शोधता, नात्यांची श्रीमंती कशी जपावी, याचा हा जिवंत वस्तुपा' आहे.कांचन यांच्या या निस्वार्थ सेवेचे प्रतिबिंब त्यांच्या मुलांमध्येही उमटले. नातू तन्मय हा आजीचा लाडका 'बाबू' झाला, तर नात मानसी आजीची सावली बनली. आजीने आपल्या हातातील सोन्याची अंगठी नात मानसीला दिली, तो केवळ धातूचा तुकडा नव्हता, तर कांचन यांनी केलेल्या सेवेला मिळालेला सर्वोच्च आशीर्वाद होता.

**धनंजय कपाले, वाशीम**

# सोलर टाकून अतिक्रमण, कसे करावे भ्रमण !

***सामाईक वापराच्या जागेवरील बेकायदेशीर सौर उर्जा पॅनल त्वरीत काढावीत**
***व्यंकटेश सोसायटी मधील नागरिकांचे जिल्हाधिकारी यांना निवेदन**
***सौर उर्जा पॅनलमुळे जीवित हानीची शक्यता**
***सौर उर्जा पॅनल मुळे व्यंकटेश सोसायटी मधील ईमारतीस धोका**

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशिम येथील गोदेश्वर भागातील वाशीम - रिसोड रस्त्याला लागून असलेल्या व्यंकटेश सोसायटीच्या सदनिकेवरील टेरेस वरील मोकळ्या आणि सार्वजनिक वापरल्या जागेवर सदनिकेमधील काही नागरिकांनी सौर उर्जा पॅनल बेकायदेशीर रित्या व सद?निकेमधील इतर नागरिकांची कोणतीही परवानगी न घेता लावले या सौर पॅनल मुळे भविष्यात जीवितहानी होण्याची शक्यता आहे तसेच सार्वजनिक वापरासाठी खुली असलेली जागाच शिल्लक राहण्याची शक्यता नसल्याने प्रशासनाने व्यंकटेश सोसायटीच्या इमारती वरील सर्व सौर पैनल त्वरीत काढून टाकण्याचे मागणी या सोसायटीमधील नागरिकांनी २ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी दिलेल्या निवेदनाव्दारे केली आहे.

या निवेद?नात व्यंकटेश सोसायटी मधील चौथ्या मजल्या वरील जागरुक नागरिकांनी सदनिकेवरील खुल्या आणि सार्वजनिक वापराच्या जागेवर काही नागरिकांनी मनमानी पद्धतीने सोसायटी मधील सह- सदनिका धारकांची व सोसायटी मधील अध्यक्ष व सांचालक मंडळाची कोणतीही परवानगी न घेता वाटेल त्या ठिकाणी सौर उर्जा पॅनल बसवलेले आहे. अशा मनमानी आणी अवैध पद्धतीने लावण्यात आललेल्या सौर उर्जा पॅनल के इमारतीवरील वरच्या भागाला गळतीचा धोका निर्माण झालेला आहे. वरील मजल्यावर राहत असलिल्या सर्व सद?निका धारकाच्या आणी घराचे छत आणि स्लैब एकच असल्यामुळे पाण्याची गळती होण्याची शक्यता आहे परिणामी सर्व इमारतीचे पाण्याची कमी होवून सर्व चौथ्या मजल्या वरील नागरिकांना याला त्रास होणार असल्याली बाबत या निवेदनात जागरूक नागरिकांनी नमूद केली आहे.

सध्या व्यंकटेश सोसायटीमधील सर्व इमारतीवर सर्व सदनिको धारकाच्या सर्व प्रत्येकी पाण्याच्या टाक्या आहे. उर्वरित मोकळी जागा ही सार्वजनिक वापरासाठी खुली असून त्या खुल्या जागेवर सायटीची सर्व रहिवासी मुलांना खेळण्यासाठी , धान्य वाढवणासाठी, कपडे वाळत टाकण्यासाठी आणि घरगुती कार्यक्रमा साठी उपयोग होतो आता आता सौर उर्जा पॅनलची संख्या वाढल्याने सर्व इमारतींना या पॅनल त्रास होत आहे. सार्वजनिक वापराच्या खुल्या जागेवर अतिक्रम सुरु असल्यामुळे या सौर उर्जा पनलाचा प्रक्षेक नागरिकास त्रास होणार आहे. तसेज सौर उर्जा पासून तयार होणारी उर्जही डीसी स्वरुपाली असून ती उर्जा ए सी करेट पेक्षा जास्त घातक असल्याने जीवितहानी होण्याची सुद्धा शक्यता आहे.



तरी आपण आपल्या व्यंकटेश सोसायटी मधील विना परवाना व बेकायदेशीररित्या लावलेल्या सर्व सौर उर्जेच चॅनल त्वरीत काढून टाकण्याबाबत कडक कारवाई करून आम्हाला न्याय द्यावा अशी मागणी व्यंकटेश सोसायटी मधील रहिवासी पांडुरंग इथापे अमोल सरकटे, रामभाऊ ढोरे, नंदू खरात, सागर ढोकणे, ओम मारेकर, संघदीप बाम्बोर्डे, मोहन? शिंदे,नारायण शिंदे, राजेश घुगे, प्रदीप लांडगे, गणेश देशमुख याच्या स्वाक्षऱ्या आहेत. या निवेदनाच्या प्रती विद्युत वितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता, वाशीम पालीकेचे मुख्याधिकारी वाशीम मधील सहकारी संस्थेचे सहाय्यक उपनिबंधक यांना दिल्या आहेत.

# बाबासाहेब धाबेकर विद्यालयातील विद्यार्थीनी केली पक्ष्यांच्या दाण्या-पाण्याची सोय

● सिटी न्युज ब्युरो @ केशवनगर ●

स्थानिक बा.धा. विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थीनी उन्हाळ्यात पक्षांना पाणी पिण्यासाठी खूप भटकावे लागते काहींना आपल्या परिसरात पाण्याची उपलब्धता नसल्याने खूप दूरवर जाव लागत वाढत जाणारी उष्णता व नसऱ्या पिण्याच्या पाण्याच्या सोयीमुळे अनेक पक्षी मृत्युमूखी पडतात हे सर्व लक्षात घेता शाळेतील विद्यार्थानी आपल्या शाळेतील परिसरात पक्ष्याना पिण्यासाठी पाणी व झाडांच्या छायेखालीच त्यांच्या दाण्याची सोय केली .शाळेच्या आवारातील प्रत्येक झाडांना पाण्यासाठी छोटी टोपली बांधुन त्यामध्ये दररोज शाळेच्या वेळेवर पाणी टाकण्यासाठी नियोजनबध्द प्रत्येक झाड वाटुन घेतले . या उपक्रमात शाळेतील विद्यार्थानी सहभाग घेतला यांना मार्गदर्शन करतांना शाळेचे मुख्याध्यापक व्हि. वाय. सांगळे सर यांनी विद्यार्थामध्ये पक्षीप्रेम जागृत व्हावे या उद्देशाने उबोधनात्मक मार्गदर्शन केले. हा उपक्रम शाळेचे कलाशिक्षक रा.मु. पगार सर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला.



# सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा

गुरुवार, दि. ९ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## भरधाव कारची धडक; अपघातात वृद्ध महिला जखमी वाहनचालकाविरुद्ध गुन्हा

**खामगाव :** भरधाव कारने दिलेल्या धडकेत एका वृद्ध महिलेला दुखापत झाल्याची घटना ६ एप्रिल रोजी रात्री ११:१५ वाजता खामगाव रोडवरील वान प्रकल्प चौकात घडली. या प्रकरणी शेगाव पोलिसांनी ७ एप्रिल रोजी अज्ञात कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

श्रद्धा मुन्नालाल गुप्ता (रा. आदर्श नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांची आई नीलम मुन्नालाल गुप्ता या वाटिका चौकातून चौपाटीकडे पायी जात असताना पाठीमागून भरधाव आलेल्या पांढऱ्या रंगाच्या कारने त्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात नीलम गुप्ता यांना डोके, मान व डाव्या हाताला दुखापत झाली आहे.वाहनाचा वेग जास्त असल्याने कारचा क्रमांक लक्षात आला नसल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी पोलिसांनी अज्ञात पांढऱ्या रंगाच्या चारचाकी वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

# पटसंख्या टिकवण्यासाठी शिक्षकांची धडपड सुरू!

## आकर्षित करण्यासाठी ऑटो भाड्यांचीही ऑफर

प्रतिनिधी ९ एप्रिल

**खामगाव :** खासगी शाळांच्या वाढत्या प्रभावामुळे शासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांवरील गळती दिवसेंदिवस वाढत चालली आहे. त्यामुळे शाळांची पटसंख्या टिकवणे म्हणजे शिक्षकांसाठी जिवावरचे काम बनले आहे. विद्यार्थ्यांचा शोध घेण्यासाठी शिक्षकांची धावपळ सुरू असून, काही शिक्षक तर ऑटोभाड्याचं आमिष देत विद्यार्थ्यांना पटवण्याचा प्रयत्न करत आहेत.

सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, निकाल जाहीर होताच टीसी (शाळा सोडल्याचा दाखला) साठी गर्दी वाढते आणि त्यातच विद्यार्थ्यांना रोखण्यासाठी शिक्षकांचे टोकाचे प्रयत्न सुरू होतात. शाळेच्या प्रांगणातच शिक्षक-पालकांमध्ये वादाच्या घटना घडतात.



काही शिक्षक विद्यार्थ्यांना दुसऱ्या शाळांमध्ये जायला विरोध करत त्यांचा टीसी उचलण्यास थेट अडवतात. त्यामुळे हे वाद आता पोलिस ठाण्यापर्यंत पोहोचू लागले आहेत.निवासी शाळा व आदिवासी विकास विभागाच्या वसतिगृहांमध्ये प्रवेशासाठी घाटावरील शिक्षकांनी आता थेट संग्रामपूर व जळगाव जामोद तालुक्यांत मोर्चा वळवला आहे.आदिवासी विद्यार्थ्यांचा शोध घेण्यासाठी शिक्षकांनी तळ ठोकल्याचे चित्र समोर आले आहे. वसतिगृहातील प्रवेशासाठी पटसंख्या भरविण्याची जबाबदारी शिक्षकांवर असते. मात्र यावर्षी विद्यार्थी अपुरे पडू नयेत म्हणून शिक्षक प्रयत्न करीत आहे.शाळांमधील पटसंख्या घटू नये म्हणून शिक्षण विभागात सध्या धावपळीचे वातावरण आहे.

विद्यार्थ्यांना आपल्या शाळेत ठेवण्यासाठी काही शिक्षकांनी निकालाच्या दिवशीच विद्यार्थ्यांना गाठून दुसऱ्या शाळांमध्ये नेल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आले आहेत.

एका जिल्हा परिषद शाळेतील तब्बल ११ विद्यार्थी खासगी शाळेच्या शिक्षकांनी थेट निकालानंतर गाठून पळविल्याचा आरोप करण्यात आला आहे.पालकांना गोड बोलून, ऑटोभाड्याची ऑफर देऊन व शैक्षणिक सुविधा वाढविल्याच्या नावाखाली हे विद्यार्थी दुसऱ्या शाळांमध्ये दाखल करण्यात आल्याची चर्चा आहे.

## जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्यातील क्षेत्रीय प्रशिक्षणास प्रारंभ

प्रतिनिधी ९ एप्रिल

**बुलढाणा :** जनगणना २०२७ च्या पूर्वतयारीचा भाग म्हणून, पहिल्या टप्प्यातील क्षेत्रीय प्रशिक्षकांचे (फिल्ड ट्रेनर) जिल्हास्तरीय प्रशिक्षण जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात उत्साहात सुरू झाले आहे. हे प्रशिक्षण ११ एप्रिलपर्यंत चालणार असून, याद्वारे आगामी जनगणनेच्या तांत्रिक आणि क्षेत्रीय कामाची पायाभरणी केली जात आहे.

या पाच दिवशीय प्रशिक्षण कार्यक्रमाचा शुभारंभ सोमवार ६ एप्रिल रोजी करण्यात आला. यावेळी बुलढाण्याचे जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्यासोबतच संचालनालयाच्या जनगणना कार्यालयातील सांख्यिकी अन्वेषक (ग्रेड २) पवन घोडे आणि मयूर पवार यांनी मार्गदर्शन केले. यावेळच्या जनगणनेचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ही प्रक्रिया डिजिटल स्वरूपात पार पडणार आहे. प्रशिक्षणादरम्यान क्षेत्रीय प्रशिक्षकांना डिजिटल जनगणनेची माहिती, मोबाईल ॲपचा वापर आणि माहिती संकलित करण्याच्या



आधुनिक पद्धतींबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येत आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण दोन सत्रांमध्ये आयोजित करण्यात आले आहे. यामध्ये मास्टर ट्रेनर म्हणून संजय खडसे (उपविभागीय अधिकारी, सिंदखेड राजा) व डॉ. रामेश्वर पुरी (उपविभागीय अधिकारी, खामगाव) हे अधिकारी क्षेत्रीय प्रशिक्षकांना सखोल प्रशिक्षण देत आहेत. या जिल्हास्तरीय प्रशिक्षणासाठी जिल्ह्यातील सर्व नियुक्त क्षेत्रीय प्रशिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हे प्रशिक्षित फिल्ड ट्रेनर पुढे जाऊन प्रत्यक्ष जनगणनेच्या कामात सहभागी होणाऱ्या कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.

## वीजचोरीचा पर्दाफाश दोन प्रकरणांत 90 हजारांहून अधिक नुकसान

प्रतिनिधी ९ एप्रिल

**खामगाव :** शेगाव तालुक्यातील जवळा पळसखेड येथे वीज चोरीची दोन स्वतंत्र प्रकरणे उघडकीस आली आहेत. महावितरणच्या भरारी पथकाच्या तक्रारीवरून तिघांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पहिल्या प्रकरणात, अतिरिक्त कार्यकारी अभियंता राजेश नारायणराव श्रीवास (वर्धा) यांच्या फिर्यादीवरून सोपान बळीराम खोंड (रा. जवळा पळसखेड) याच्यावर कारवाई करण्यात आली. १३ मार्च २०२६ रोजी तपासणी दरम्यान १.४१३ किलोवॅट वीज भार अनधिकृत वापरात असल्याचे आढळले. मागील १२ महिन्यांत सुमारे २,२८६ युनिट वीज वापरल्याने महावितरणचे अंदाजे ५०,२४० रुपयांचे नुकसान झाल्याचे निष्पन्न झाले.

दुसऱ्या प्रकरणात, त्याच दिवशी दुपारी केलेल्या तपासणीत केशरबाई शिवशंकर खोंड (७५) व सुनीता राजू खोंड (५५) यांच्या घरात १.२९१ किलोवॅट वीज भार अनधिकृतरीत्या वापरात असल्याचे आढळले. त्यांनी सुमारे १,८३७ युनिट वीज चोरून वापरल्याने महावितरणचे अंदाजे ४१,०२० रुपयांचे नुकसान झाले. दोन्ही प्रकरणांत प्रत्येकी ४,००० रुपयांची तडजोड रक्कम निश्चित केली होती.

## चिखली तहसीलच्या वतीने समाधान शिबिरांचे आयोजन

### नागरिकांनी लाभ घेण्याचे तहसिलदारांचे आवाहन

प्रतिनिधी ९ एप्रिल

**चिखली :** सर्वसामान्यांचे प्रश्न स्थानिक पातळीवर सुटावेत आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ एकाच छताखाली मिळावा, या उद्देशाने चिखली तहसील कार्यालयाच्या वतीने विशेष 'समाधान शिबिराचे' आयोजन करण्यात आले आहे.

हे शिबिर १० एप्रिल रोजी धोडप मंडळामध्ये जिल्हा परिषद शाळा, धोडप, १६ एप्रिल रोजी मेरा खुर्द मंडळा मध्ये विश्रामगृह, मेरा खुर्द, १७ एप्रिल रोजी पेठ मंडळा मध्ये ज्ञानेश्वर विद्यालय , पेठ व २४ एप्रिल रोजी शेळगाव आटोळ मंडळा मध्ये जिल्हा परिषद शाळा, शेळगाव आटोळ येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात फेरफार अदालत घेणेः प्रलंबित नोदणीकृत व अनोदणीकृत फेरफार मंजूर करणे पंतप्रधान आवास योजना व इतरा राज्य स्तरीय घरकुल योजने अंतर्गत मंजूर घरकुल यांना ५ ब्रास प्रती घरकुल या प्रमाणे मोफत वाळू उपलब्ध करणे व त्याबाबत अर्ज मंजुरी देणे, किसान योजनेतर्गत पात्र शेतकरी यांचे 'तेंहे ाुगृहु करणे, नैसर्गिक आपत्ती मध्ये नुकसान झालेल्या पात्र शेतकऱ्यांचे ाख्ण् करणे व उर्वरित शेतकरी यांची यादी अपलोड करणे, डिजिटल स्वाक्षरीत ७/१२ फेरफार वाटप करणे ,Agristack अंतर्गत शेतकरी ओळख क्रमांक (farmer ID) तयार करणे, नवीन आधार नोंदणी व आधीचे आधार अद्यावत करून देणे, उत्पन्न दाखला/जात प्रमाणपत्र/ नॉनक्रिमिलेर प्रमाणपत्र/ राष्ट्रीयत्व, वय, अधिवास प्रमाणपत्र / शेतकरी दाखला/भूमिहीन दाखला/ऐपत प्रमाणपत्र ई. प्रमाणपत्र प्रदान करणे, मतदान कार्ड वाटप करणे, आधार मतदान कार्ड जोडणी करणे, विशेष सहाय योजना लाभ देणे, संजय गांधी निराधार योजनेबाबत आधार validation बाबत कार्यवाही करणे, मोजणी शिट क प्रत वाटप करणे, पुरवठा विभागांमार्फत नवीन रेशन कार्ड/रेशन कार्ड दुरुस्ती/नाव कमी करणे नुसार digital Ration card प्रदान करणे, रेशन कार्ड बाबत ाख्ण् करणे, गावातील अकुशल व्यक्तींना जॉबकार्ड प्रदान करणे, आभाकार्ड प्रदान करणे, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना / महात्मा फुले जन आरोग्य योजना लाभ देणे, आरोग्य तपासणी व लसीकरण, महा DBT पोर्टल वर खालील वैयक्तिक लाभाचे योजनाचे लाभ देणे (फळ बाग लागवड, कृषी यांत्रिकीकरण, कोल्ड स्टोरेज, सेडनेट, पॉलीहाउस, सिंचन साधने, शेत तळे इत्यादी) पंतप्रधान आवास योजना व इतर राज्यस्तरीय घरकुल योजनेतर्गत लाभ प्रदान करणे, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या सोयीसाठी 'मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना' जाहीर केली असून या योजनेअंतर्गत शेतातील रस्ते पक्के (बारमाही) करण्यात येणार असून त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीसाठी आवश्यक यंत्रसामग्रीची ने-आण करणे तसेच शेतमाल वाहून नेणे अधिक सुलभहोणार आहे.

## रस्त्यात अडवून 2 पोलिसांना मारहाण ; गुन्हा दाखल

**संग्रामपूर :** रात्रीच्या वेळी गस्तीवर असलेल्या २ पोलिसांवर हल्ला केल्याची घटना रात्री उशिरा कवठळ रस्त्यावर घडली तामगाव पोलिसांवर हल्ला करणाऱ्या दोघांपैकी १ जण कवठळ येथील येथील रहिवासी सध्या उरळ पोलीस स्टेशन (जिल्हा अकोला) मध्ये पोलीस शिपाई म्हणून कार्यरत आहे.

हकीकत अशी की, तामगाव पोलीस स्टेशनचे पेट्रोलिंगचे वाहन घेऊन पोहेकॉ . संतोष तुळशीराम आखरे व पोलीस कॉन्स्टेबल प्रमोद मुळे हे गस्तीवर असताना त्यांना कवठळ शिवारात गुप्तधन शोधणारी टोळी आल्याची माहिती भ्रमणध्वनी वरून मिळाली असता ते कवठळ शिवारात गेले. पण तेथे कोणीच आढळले नाही.परत येत असताना कवठळ रस्त्यात आरोपी राजेश गव्हाळे वय ४२ व मनोज गव्हाळे वय ३८ ( पोलिस अंमलदार पो स्टे . उरळ) यांनी गस्तीवर ड्युटी करत असलेल्या पोलिसांना रस्त्यात अडवून त्यांचेशी नाहक हुज्जत घातली व अश्लील शिवीगाळ करून हातातील स्टीलचे कड्याने कपाळावर मारहाण करून त्या दोन पोलिसांना गंभीर जखमी केले.या प्रकरणी तामगाव पोलीस पोहेकॉं. संतोष आखरे यांनी फिर्याद दिल्यावरून वरील दोन आरोपी विरुद्ध अपराध नं. ११६ / २६ कलम १३२'१२१ '(१) ११८ (१) ११५ (२) २९६ ३५१ (२) ३ (५) भारतीय न्याय संहिता २०२३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वृत लिही पर्यंत यातील आरोपींना अटक झाली नव्हती.

## जिल्ह्यात 14 एप्रिल पर्यंत 'सामाजिक समता सप्ताह

प्रतिनिधी ९ एप्रिल

**बुलढाणा :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त जिल्ह्यात ८ एप्रिल ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत 'सामाजिक समता सप्ताह' साजरा करण्यात येणार आहे. जिल्ह्यामध्ये या सप्ताहाचे नियोजन करण्यात आले असून, समाज कल्याण विभागाच्या विविध योजनांची माहिती तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचवणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे सहाय्यक आयुक्त मनोज मेरत यांनी पत्रकार परिषदेमध्ये सांगितले. या सप्ताहाची सुरुवात आज करण्यात आली असून सामाजिक न्याय विभागाच्या योजनाची माहिती



पत्रकार परिषदेच्या माध्यमातून देण्यात आली. ९ एप्रिलला डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संत गाडगे महाराज यांच्या विचारांवर जिल्ह्यातील शासकीय निवासी शाळा व वसतिगृहामध्ये निबंध, वक्तृत्व आणि लघुनाट्य स्पर्धांचे आयोजन करण्यात येईल. १० एप्रिल रोजी समतादूतांच्या माध्यमातून पथनाट्ये सादर करून सामाजिक न्याय विभागाच्या 'मार्जिन मनी' योजनेसह इतर महत्त्वाच्या योजनांचे प्रबोधन केले जाईल. ११ एप्रिल रोजी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या सामाजिक कार्यावर आधारित विशेष कार्यक्रम तसेच 'संविधान जागर' अंतर्गत भारतीय संविधानाची माहिती व महिला मेळाव्याचे आयोजन करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महिलाविषयक कार्य अधोरेखित केले जाईल. १३ एप्रिल रोजी शाळा, महाविद्यालय, आश्रमशाळेत रक्तदान शिबीर, स्वच्छता अभियान व जात पडताळणी प्रमाणपत्र प्रदान केले जाईल. १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येईल.

## 'संजय गायकवाडांवर वादग्रस्त वक्तव्याप्रकरणी गुन्हा दाखल करा!'

### भाजपची पोलिस अधीक्षकांकडे मागणी

प्रतिनिधी ९ एप्रिल

**बुलढाणा :** आमदार संजय गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत केलेल्या वादग्रस्त विविध वक्तव्यांविरोधात ॲट्रॉसिटीसह कलमान्वये गुन्हा दाखल करावा, अशी मागणी भाजपकडून करण्यात आली आहे. याबाबत जिल्हा पोलिस अधीक्षकांना ८ एप्रिल २०२६ रोजी निवेदन सादर करण्यात आले. त्यांच्यावर

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, ६ एप्रिल रोजी झालेल्या पत्रकार परिषदेत आ. गायकवाड यांनी भाजपचे जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांच्यावर खालच्या भाषेत आरोप केले, तसेच आदिवासी आश्रम शाळेतील मुलींबाबत बदनामीकारक वक्तव्य करून त्यांचे चारित्र्यहनन केल्याचा आरोप भाजपने केला आहे. कोणताही ठोस पुरावा किंवा तक्रार नसताना असे वक्तव्य करण्यात आल्याने संबंधित मुलींच्या सामाजिक व कौटुंबिक आयुष्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो, असेही निवेदनात म्हटले आहे. अशा प्रकारच्या वक्तव्यांमुळे आदिवासी समाजात गैरसमज निर्माण होऊन आश्रम शाळांबाबत अविश्वास वाढण्याची शक्यता आहे.

## जागतिक आरोग्य दिनानिमित्त जिल्हा रुग्णालयात विविध उपक्रमांचे आयोजन

प्रतिनिधी ९ एप्रिल

**बुलढाणा :** जिल्हा रुग्णालय व परिचारिका प्रशिक्षण केंद्र, बुलढाणा येथे विविध उपक्रमांचे आयोजन करून जागतिक आरोग्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावर्षीचा घोषवाक्य 'एकत्रित प्रयत्न आरोग्यासाठी, विज्ञानाची साथ भविष्यासाठी' यावर आधारित कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला. यावेळी प्राचार्य उज्वला खेडेकर, मेट्रन आरती कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.




कार्यक्रमादरम्यान जागतिक आरोग्य दिनाचे महत्त्व अधोरेखित करत आरोग्य विषयक विविध शासकीय योजनांचा आढावा घेण्यात आला. प्राथमिक आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी जनजागृती आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या प्रभावी अंमलबजावणीवर विशेष भर देण्यात आला.मार्गदर्शनपर भाषणात जोशी यांनी निरोगी समाज निर्मितीसाठी सर्व घटकांनी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन केले. आधुनिक विज्ञानाच्या साहाय्याने आरोग्य सेवा अधिक प्रभावी करता येतात, तसेच स्वच्छता, संतुलित आहार आणि नियमित व्यायाम यांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.यावेळी 'माझे गाव, आरोग्य संपन्न गाव' मोहिमेअंतर्गत जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली. ग्रामीण भागात जनजागृतीसाठी सोशल मीडिया, स्थानिक माध्यमे, वृत्तपत्रे व यशोगाथांचा प्रभावी वापर करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. कार्यक्रमात आरोग्य पर्यवेक्षक अनिल लोखंडे यांनी सविस्तर मार्गदर्शन केल.

## शेतात राहणाऱ्या शेतकऱ्यांना २४ तास सिंगल फेज लाईन द्या - मागणी

प्रतिनिधी ९ एप्रिल

**मलकापूर :** शेतात राहणाऱ्या शेतकऱ्यांना सुध्दा २४ तास सिंगल फेज लाईन देण्यात यावी, अशी मागणी बुलढाणा जिल्हा किसान काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष संभाजी शिर्के-देशमुख यांनी आज ८ एप्रिल रोजी वीज वितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता मलकापूर यांच्याकडे केली आहे.

दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, गेल्या अनेक दिवसापासून महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार संध्याकाळी सहा ते दहाच्या दरम्यान शेतात राहणाऱ्या शेतकऱ्यांचा सिंगल फेज पुरवठा बंद करण्यात येत आहे. त्यामुळे शेतात राहणारे शेतकऱ्यांना प्रचंड हाल सहन करावे लागतात. तसेच या शिवारामध्ये बिबट्याचा वावर अधिक प्रमाणात वाढलेला असून जनावरांच्या तसेच लहान लेकरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न सुध्दा निर्माण झालेला आहे. तसेच यादरम्यान हा परीक्षेचा काळ असून संध्याकाळी अभ्यासाची वेळ असल्यामुळे मुलांच्या भवितव्याचा प्रश्न सुध्दा निर्माण झालेला आहे.त्यामुळे दाताळा वीज वितरण कंपनी अंतर्गत येणाऱ्या वरखेड, सावळी, भाडगणी, लासुरा शिवारातील शेतकऱ्यांना २४ तास सिंगल फेज लाईन पुरवठा करण्यात यावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

निवेदन देतेवेळी आनंद धुरंधर, मंगेश वानखेडे, अजाबराव वानखेडे, योगेंद्रसिंह राजपूत, ऋषिकेश टापरे, दे. रा. चव्हाण, अक्षय तायडे, रविंद्र सोनवणे, अमोल इंगळे, गणेश होनाळे, अविनाश जवंजाळ, धोमेश सपकाळ, सुधीर देशमुख, किशोन होनाळे, मयुर तायडे, दिपक गुरचळ, रूपेश शंखपाळ, अजय राऊत, गजेंद्र राजपूत, अनिल वानखेडे, सुरज राजपूत यांचेसह बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते.

## बुलढाणा जिल्हा परिषदेचा पॅटर्न! 'मिशन झेड'

### - 'मिशन झेड' उपक्रमांतर्गत खामगावात विद्यार्थी-पालक मेळावा संपन्न
### - गरिबांची मुले होणार डॉक्टर आणि आयआयटीयन्स!

प्रतिनिधी ९ एप्रिल

**खामगाव :** समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल परंतु हुशार विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची दारे खुली करून देण्यासाठी बुलढाणा जिल्हा परिषदेने 'मिशन झेड' हा क्रांतिकारी प्रकल्प हाती घेतला आहे. या उपक्रमांतर्गत खामगाव येथील 'गुंजकर एज्युकेशन हब'मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नुकताच एक विशेष मेळावा आयोजित करण्यात आला होता. या सभेला विद्यार्थी आणि पालकांचा अभूतपूर्व प्रतिसाद लाभला.

**राज्यात केवळ बुलढाणा जिल्हा परिषदेचा पुढाकार**

बुलढाणा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदरणीय डॉ गुलाबराव खरात साहेब यांच्या संकल्पनेतून हा 'मिशन झेड' प्रकल्प आकारास आला आहे. विशेष म्हणजे, अशा प्रकारचा उपक्रम राबविणारी बुलढाणा ही महाराष्ट्रातील एकमेव जिल्हा परिषद ठरली आहे. गोरगरीब




विद्यार्थ्यांना खाजगी कोचिंगच्या तोडीचे किंवा त्याहूनही सरस शिक्षण मिळावे आणि ग्रामीण भागातील गुणवत्ता महाराष्ट्राच्या नकाशावर चमकावी, हा मुख्य हेतू खरात साहेबांनी या प्रकल्पामागे ठेवला आहे.

**मान्यवरांच्या हस्ते गुणवंतांचा सत्कार**

या सभेदरम्यान उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी (योजना) डॉ. वैशाली ठग मॅडम, खामगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी चंदनसिंग राजपूत साहेब आणि गटशिक्षणाधिकारी उमेशजी जैन साहेब यांचा समावेश होता. अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना यशासाठी प्रोत्साहन दिले.

**१०० टक्के निकालाची ग्वाही**

'गुंजकर एज्युकेशन हब, खामगाव' येथे सध्या हे विद्यार्थी सराव आणि तयारी करत आहेत. येणाऱ्या शैक्षणिक सत्रामध्ये या विद्यार्थ्यांचे निकाल संपूर्ण महाराष्ट्रात चमकतील आणि इथले विद्यार्थी आयआयटी व एमबीबीएस (MBBS) मध्ये १०० टक्के प्रवेश घेतील, अशी ग्वाही यावेळी जिल्हा प्रशासनाला देण्यात आली.

या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील पालकांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण झाले असून, जिल्हा परिषदेच्या या महत्त्वाकांक्षी पावलाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

हा उपक्रम बुलडाणा जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात राबविल्यास सर्व सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी सहज उपलब्ध होऊ शकते. आजही ग्रामीण भागातील अनेक प्रतिभावंत विद्यार्थी केवळ आर्थिक अडचणीमुळे उच्च शिक्षणापासून वंचित राहतात.

## पिंप्री देशमुख परिसरात मुरुमाची अवैध वाहतूक

**खामगाव :** तालुक्यातील पिंप्री देशमुख शिवारातून मुरूमाची अवैध उत्खनन करून वाहतूक करणाऱ्या टिप्पर चालकाविरुद्ध खामगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात ८ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजता गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी ग्राम महसूल अधिकारी कार्तिक रघुनाथ जाधव (२५) यांनी फिर्याद दिली आहे. गट क्रमांक ५४ मध्ये आरोपी टिप्पर (एमएच २८ बीबी ७५३७) चालकाने गौण खनिजाचे अवैध उत्खनन करून सुमारे २ ब्रास मुरूम (अंदाजे किंमत ६ हजार रुपये) भरून वाहतूक करत असल्याचे आढळून आले. फिर्यादी यांनी संबंधित वाहन अडवण्याचा प्रयत्न केला असता आरोपीने टिप्परमधील मुरूम खाली करून घटनास्थळावरून पळ काढला. याप्रकरणी खामगाव भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

गुरुवार, दि. ९ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com



# रविना पवारची लव्ह जिहादमध्ये हत्या

- इतर आरोपींच्या अटकेशिवाय मृतदेह घेणार नाही - कुटुंबीय
- अकोला जळीत हत्याकांडः मृताच्या कुटुंबीयांचा आक्रोश
- हिंदूत्ववादी संघटना आक्रमक
- पोलिस इतर आरोपींचा शोध घेणार का

प्रतिनिधी ९ एप्रिल

**अकोला :** डाबकी रोड पोलीस स्टेशनच्या हद्दीतील अन्नपूर्णा माता मंदिराजवळील ले-आउटमध्ये दोन दिवसांपूर्वी आढळलेल्या अर्धवट जळालेल्या मृतदेहाचे गूढ अखेर उकलले आहे. चारित्र्याच्या संशयावरून आणि कौटुंबिक वादातून पतीनेच पत्नीची हत्या करून पुरावा नष्ट करण्यासाठी तिचा मृतदेह जाळल्याचे निष्पन्न झाले आहे. पोलिसांनी आरोपी पतीला ताब्यात घेतले आहे. वर्धा येथे राहत असलेल्या मृतक महिलेला फूस लावून मुंबईला पळवून नेत तिथे तिला गर्भवती करत आठ दिवसांच्या बाळाच्या जन्मानंतर तिची हत्या करण्यात आली आहे. या महिलेला कथित पती हा तिच्या मुळ गावतील रहिवासी असून आज महिलेच्या परिवाराने सर्व आरोपींना अटक केल्याशिवाय महिलेचा मृतदेह स्विकारण्यास नकार दिला.



दिनांक ६ एप्रिल २०२६ रोजी डबकी रोड परिसरात एका अज्ञात महिलेचा चेहरा आणि शरीर अर्धवट जळालेल्या अवस्थेत पोलिसांना मिळून आले होते. मृतदेहाची ओळख पटू नये या उद्देशाने चेहरा विद्रूप करण्यात आला होता. घटनेचे गांभीर्य ओळखून जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा आणि डाबकी रोड पोलिसांनी तपास चक्रांना वेग दिला. तपास पथकाने परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता काही संशयास्पद हालचाली दिसून आल्या. मात्र, शहरात कुठेही महिला बेपत्ता असल्याची नोंद नसल्याने ओळख पटवणे कठीण झाले होते. अखेर पोलिसांनी व्हॉट्स अ?प आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून मृत महिलेचे छायाचित्र प्रसारित केले.

सोशल मीडियावर माहिती पसरताच, ८ एप्रिल रोजी आरोपी सादीक शहा तसरीफ शहा (वय २९, रा. नांदखेडा, जि. वाशिम) याने स्वतः पोलीस स्टेशन गाठून गुन्ह्याची कबुली दिली. त्याने आपली पत्नी रविना मोहन पवार (वय २४) हिची हत्या केल्याचे मान्य केले. मिळालेल्या माहितीनुसार, सादीक आणि रविना यांचा प्रेमविवाह झाला होता. मात्र, लग्नानंतर त्यांच्यात सतत खटके उडत होते. घटनेच्या रात्री झालेल्या तीव्र वादातून सादीकने रविनाची हत्या केली. त्यानंतर मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी त्याने तो निर्जन स्थळी नेऊन जाळण्याचा प्रयत्न केला.ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शंकर शेळके, दीपक कोळी, अभिषेक अंधारे, अनिल चव्हाण व त्यांच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली. पुढील तपास डबकी रोड पोलीस करत आहेत.



### रविनाच्या परिवाराचे गंभीर आरोप

डाबकी रोड परिसरात झालेल्या रविना पवार या विवाहितेच्या निर्घृण हत्येप्रकरणी आता नवा पेच निर्माण झाला आहे. आरोपी पती सादीक शहा याने गुन्ह्याची कबुली दिली असली, तरी मृताच्या नातेवाईकांनी या हत्येत अनेक जण सामील असल्याचा खळबळजनक आरोप केला आहे. जोपर्यंत सर्व आरोपींना फाशी मिळत नाही, तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही, असा पवित्रा कुटुंबीयांनी घेतला आहे. मृताचा भाऊ अर्जुन सोळंके याने प्रसारमाध्यमांशी बोलताना अत्यंत गंभीर आरोप केले आहेत. तो म्हणाला, 'एवढा मोठा गुन्हा सादीक एकटा करूच शकत नाही. यात त्याला अनेकांचा पाठिंबा आहे. त्याची आई दुसऱ्याच दिवशी गावात आली आणि परिस्थितीचा आढावा घेऊ लागली. पैशाच्या जोरावर हे प्रकरण दाबायचा त्यांचा प्रयत्न आहे, पण आम्ही तो यशस्वी होऊ देणार नाही.' रविनाच्या बहिणीने आणि आईने देखील आक्रमक भूमिका घेतली आहे. 'आमच्या बहिणीला अत्यंत निर्दयीपणे मारले गेले. आम्हाला फक्त आणि फक्त न्याय हवा आहे. या प्रकरणातील सर्व संशयितांना अटक करून त्यांना तात्काळ फाशी द्या. जोपर्यंत आम्हाला न्याय मिळत नाही, तोपर्यंत आम्ही मृतदेहाला हातही लावणार नाही,' अशा शब्दांत त्यांनी आपला संताप व्यक्त केला.उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी सादीक शहा सध्या पोलिसांच्या ताब्यात असून त्याला उद्या न्यायालयात हजर केले जाईल. पोलीस कोठडी दरम्यान या गुन्ह्यात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा सखोल तपास केला जाईल.अकोला पोलीस या प्रकरणाचा तपास करत असून, नातेवाईकांच्या आरोपांमुळे आता तपासाची व्याप्ती वाढण्याची शक्यता आहे.

# जिल्ह्यातील 108 'आपले सरकार सेवा केंद्रांवर धडक कारवाई !

प्रतिनिधी ९ एप्रिल

**♦ व्यापक पडताळणीत आढळून आले अनियमितता**

**अकोला :** जिल्हाधिकारी यांच्या निर्देशानुसार अकोला जिल्ह्यातील सर्व 'आपले सरकार सेवा केंद्र' व 'आधार सेवा केंद्रां'ची सखोल पडताळणी मोहीम राबविण्यात आली. या तपासणीदरम्यान अनेक केंद्रे त्यांच्या नियोजित ठिकाणी कार्यरत नसणे, सेवा गुणवत्तेमध्ये त्रुटी, तसेच नागरिकांना वेळेत सेवा न मिळणे अशा गंभीर बाबी निदर्शनास आल्या. त्यामुळे जिल्ह्यातील १०८ केंद्रांवर धडक कारवाई करण्यात आली. तसेच पथकाद्वारे त्यांचा पंचनामा करण्यात आला. यामुळे सेतू संचालकांमध्ये खळबळ उडाली आहे.



डिजिटल इंडिया अभियानांतर्गत नागरिकांना शासकीय सेवा पारदर्शक व वेळेत उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाच्या 'आपले सरकार सेवा केंद्र' योजनेची अंमलबजावणी सुरू आहे. सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान) यांच्या १९ जानेवारी २०१८ च्या शासन निर्णयानुसार या केंद्रांचे विस्तृत जाळे राज्यभर कार्यरत आहे. मात्र जिल्ह्यातील अनेक सेतू सुविधा केंद्रं मूळ ठिकाणी अस्तित्वात नसल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. जिल्हा प्रशासनाने या अनियमिततेची गंभीर दखल घेत महत्त्वपूर्ण उपाययोजना राबविल्या आहेत. त्या अनुषंगाने प्रत्येक 'आपले सरकार सेवा केंद्रा'वर क्यूआर कोड प्रणाली लागू करण्यात आली आहे. तसेच नागरिकांना थेट तक्रार व अभिप्राय नोंदविण्यासाठी विशेष डिजिटल यंत्रणा सुरू करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे हेल्पलाईन क्रमांक : ०८० ६५९० ९८४४ उपलब्ध करून देण्यात आला आहे. सेवा केंद्रांवर सतत देखरेख व मूल्यांकनाची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे सेतू संचालकांच्या मनमानीला आता चाप बसणार आहे.

# नगरसेवकांच्या निलंबनानंतर शुक्रवारी होणारी आमसभा ठरणार का वादळी ?

प्रतिनिधी ९ एप्रिल

**अकोला :** उद्या शुक्रवारी अकरा वाजता महापालिकेची महत्त्वपूर्ण विषयांना घेऊन सर्वसाधारण सभा संपन्न होईल. या सभेकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. कारण ३० मार्च रोजी घडलेल्या प्रकारानंतर विरोधी पक्षाने तीव्र आक्रमक भूमिका घेत नगर विकास विभागाच्या प्रधान सचिवांकडे अधिकृत अपील दाखल केले आहे. सभागृहात कोणतीही वैधानिक प्रक्रिया न पाळता १६ नगरसेवकांना तीन बैठकींसाठी निलंबित करण्याचा घेतलेला निर्णय हा लोकशाही मूल्यांना तिलांजली देणारा व नियमबाह्य असल्याचा गंभीर आरोप विरोधी पक्षाने केला आहे. परंतु अद्यापही १६ नगरसेवकांच्या निलंबना बाबत प्रधान सचिवांकडून कुठलाही निर्णय आला नाही त्यामुळे

**♦ महापालिका आवारात विरोधक प्रतिसभा घेऊन देतील उत्तर !**

उद्या महापालिका आवारात विरोधी पक्षातर्फे प्रति सभा आयोजित करून सर्वसाधारण सभेला प्रतिउत्तर दिले जाईल अशी माहिती मिळाली आहे त्यामुळे उद्या सुद्धा महापालिका परिसरात सत्ताधारी व विरोधकांमध्ये जोरदार संघर्ष पाहायला मिळेल. शुक्रवारी होणाऱ्या सर्वसाधारण सभेत शहर विकास प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणावरील निधी आणि खर्चाबाबत निर्णय घेतला जाईल. या सभेत १८२ कोटी रुपयांच्या निधीसह विविध योजना आणि विशेष निधींच्या नियोजनावर आणि खर्चावर चर्चा करून निर्णय घेतला जाईल.

याव्यतिरिक्त, शहर हद्दीतील महानगरपालिकेच्या जमिनीचे बीओटी आणि पीपीपी तत्त्वावर विकासासाठी वाटप करण्याबाबतही निर्णय घेतला जाईल.

२०२६-२७ या आर्थिक वर्षात, नगरोत्थान महा अभियानांतर्गत ५० कोटी रुपये, बिगर-दलित झोपडपट्टी सुधारणा निधीसाठी ५० कोटी रुपये, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी झोपडपट्टी सुधारणा योजनेसाठी ३० कोटी रुपये आणि विशेष निधीअंतर्गत विशेष विकास कामांसाठी २ कोटी रुपयांचे वाटप केले जाईल. याव्यतिरिक्त, हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोक कल्याण अभियान राबवण्याचे उद्दिष्ट आहे.

स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत हागणदारीमुक्त आणि जल प्रमाणपत्र मिळवण्यासाठी, अकोला शहर शहरातील सर्व सार्वजनिक शौचालयांची दुरुस्ती आणि देखभाल, जुन्या शौचालयांच्या दुरुस्तीसाठी आणि नवीन शौचालयांच्या बांधकामासाठी डीपीआर तयार करण्याकरिता व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती यावर चर्चा केली जाईल.

**१८२ करोड रुपयाच्या निधीच्या नियोजनासाठी उद्याची सभा, बीओटी पीपीपी तत्वावर विकासासाठी वाटप करण्यावर होईल चर्चा**

तसेच, शहरातील विविध ठिकाणी बीओटी आणि पीपीपी प्रकल्प राबवण्यासाठी प्रस्ताव मागवणे आणि या प्रकल्पांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करणे यावरही बैठकीत निर्णय घेतला जाईल.

या सर्व महत्वपूर्ण विषयांवर सर्वसाधारण सभेत आवाज उठवण्यासाठी विरोधी पक्ष सभागृहात हजर नसल्याने सत्ताधाऱ्यांना आपल्या सोयीनुसार सर्व विषयांना मंजुरी देणे सोयीचे होणार आहे. त्यामुळे उद्याच्या प्रतीसभेत विरोधक सत्ताधाऱ्यांच्या या निर्णयांना कसा विरोध करतील हे पाहणे उचित ठरणार आहे.

# नदीच्या सौंदर्यीकरणासाठी नवीन उपाययोजना राबविणार !

## भाजपच्या स्थापना दिनानिमित्त उपक्रम , मोर्णा स्वच्छता मोहिमेचा तिसरा दिवस

प्रतिनिधी ९ एप्रिल

**अकोला :** शहराच्या मध्यभागातून वाहणाऱ्या व शहराची जिल्ह्याची असलेल्या मोर्णा नदीच्या स्वच्छतेला गत दोन दिवसांपासून सुरूवात झाली असून, आज तिसरा दिवस आहे. या नदीच्या साफसफाई व स्वच्छतेसाठी नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत असून, तिच्या सौंदर्यीकरणासाठी उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

भाजपच्या स्थापना दिनानिमित्त मोर्णा नदी स्वच्छतेचा सप्ताह शहरात राबविण्यात येत आहे. या सप्ताहात भाजपाचे लोकप्रतिनिधी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. शहराची धरोहर असलेल्या मोर्णा नदीच्या स्वच्छतेला लोकांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. भाजप पक्षाच्या स्थापनेनिमित्त राबविण्यात येणाऱ्या सप्ताहाचा आज तिसरा दिवस असून, मोर्णा नदी १० किलोमीटरपर्यंत स्वच्छ करण्यात येणार आहे. या उपक्रमावेळी जिल्हाधिकारी वर्षा मीना, पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, मनपा



आयुक्त सुनील लहाने यांनी भेट देऊन या उपक्रमाची केली प्रशंसा केली. यावेळी सभापती विजय अग्रवाल यांनी जिल्हाधिकारी वर्षा मीना, जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक महानगरपालिका आयुक्त सुनील लहान यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी सभापती विजय अग्रवाल, जिल्हाधिकारी वर्षा मीना आणि पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांनी या उपक्रमाची आवश्यकता अधोरेखित करीत मनोगत व्यक्त केले. यावेळी आ. रणधीर सावरकर, खा. अनुप धोत्रे, महानगर अध्यक्ष जयंतराव मसने, मनपा सभापती विजय अग्रवाल, महापौर शारदा खेडकर, किशोर मांगटे पाटील, उप महापौर अमोल गोगे, संजय गोटफोडे, आम्रपाली उपरवट, पवन महल्ले सागर शेगोकार, संदीप गावंडे, तुषार भिरड, अमोल गिते, गोपाल मुळे, रणजित खेडकर, संतोष पांडे, राजेंद्र गिरी, मनीष बुंदेले, सौ वैशाली शेळके, आरती घोगलिया, चंदा शर्मा, ॲड. कल्पना गोटफोडे, प्राची काकड, रंजना विंचनकर, डॉ राजु देशपांडे, डॉ अभय जैन, डॉ सुजित फोकमारे, डॉ नरेश गौड, डॉ तुषार मालोकार, डॉ अजय चव्हाण, शरद तूरकर, नितीन ताकवाले, संदीप शेगोकार, संतोष डोंगरे, राजेश्वर धोटे, गणेश अंधारे, सौ सोनाली अंधारे, अमोल मोहोकार, नितेश पाली, शितल जैन, विनोद मनवाणी, विनोद मापारी ,किशोर व?ोकार, विशाल इंगळे, हर्षद भांबेरे, गजानन सोनोने, दिलीप भरणे, विलास शेळके, धनंजय धबाले, सुनील बाठे, संजय बडोणे, सिद्धार्थ उपरवट, शाम विंचनकर, हर्ष चौधरी, जमीर खान, प्रणिता समरीतकर, रुचा पाटील, योगिता पावसाळे, भाग्यश्री देशमुख, वासुदेव गोलाईत, राहुल चौरसिया, नवीन जाधव, अमोल वानखडे, अनिकेत पवार, विक्की भिसे, गोपाल नागपुरे, रितेश जामणारे, ऋषिकेश महल्ले, प्रणित अग्रवाल, अतुल अग्रवाल, बाळू ताले, अमित इंगळे, अरविंद कोरपे, आकाश श्रीनाथ, गजानन वाडेकर, पल्लवी नगरे, चंदा ठाकूर, निशा कढी, श्रीकांत गावंडे, स्वप्नील भगत, प्रवीण झापर्डे, दिनेश पवार, दिलीप भरणे, कपिल मुरूमकर,रुपेश फाटे, निलेश निनोरे, वैभव मेहरे, राहुल इंगळे, पंकज राठी, अभिषेक भगत, हर्ष चौधरी, हेमंत सटवाले, फिरोज खान, जुनेद खान, जय अग्रवाल, तसेच आदी महानगर पदाधिकारी, मंडळा पदाधिकारी, नगरसेवक आदी उपस्थित होते.





# उद्या मूर्तिजापूर येथे महाराजस्व समाधान शिबिर

प्रतिनिधी ९ एप्रिल

**अकोला :** मूर्तिजापूर तालुक्यातील लाखपुरी मंडळ, लक्षेश्वर संस्थान येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे भव्य आयोजन १० एप्रिल रोजी सकाळी १० वाजता करण्यात आले आहे. राज्याचे मा. महसूलमंत्री श्री. चंद्रशेखरजी बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थिती यावेळी राहणार आहे. या शिबिरात नागरिकांच्या महाराजस्व समस्या तात्काळ सोडवल्या जातील. तरी नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# १४ एप्रिलपासून अकरा रेल्वे गाड्यांचे नवे वेळापत्रक

प्रतिनिधी ९ एप्रिल

**अकोला :** अकोला ,अमरावती, बडनेरा यासह अनेक स्थानकांवर आगमन आणि प्रस्थान वेळेत बदल होणार.

अकोलाः मध्य रेल्वेने भुसावळ विभागातील मेल आणि एक्सप्रेस गाड्यांसह ११ गाड्यांच्या वेळापत्रकात महत्त्वपूर्ण बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. हे सुधारित वेळापत्रक १४ एप्रिल २०२६ पासून टप्प्याटप्प्याने लागू केले जाईल, ज्यामुळे अकोला, अमरावती, आणि बडनेरा यासह अनेक प्रमुख स्थानकांवरील गाड्यांच्या आगमन आणि प्रस्थान वेळेत बदल होईल. रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार, नाशिक रोड ते अमरावती दरम्यानच्या अनेक स्थानकांवर छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-अमरावती एक्सप्रेस (१२१११) च्या वेळापत्रकात बदल करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे, मुंबई-नागपूर दुरंतो (१२२८९) आणि नागपूर-मुंबई दुरंतो (१२२९०) यांच्या वेळापत्रकातही बदल करण्यात आला आहे.

तसेच, हावडा मेल (१२८०९), अहमदाबाद-पुरी एक्सप्रेस (१२८४४, २०८६२), गांधीधाम-पुरी एक्सप्रेस (२२९७३), विदर्भ एक्सप्रेस (१२१०५), अमृत भारत एक्सप्रेस (१९०२२) अजनी-पुणे साप्ताहिक एक्सप्रेसच्या (२२१४०, २२१२४) वेळापत्रकातही बदल करण्यात आला आहे. बडनेरा स्थानकावरील या सर्व गाड्यांच्या आगमन आणि प्रस्थान वेळेत विशेष बदल करण्यात आले आहेत. गैरसोय टाळण्यासाठी ट्रेनच्या वेळा तपासाः रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना प्रवासापूर्वी अद्ययावत वेळापत्रक तपासण्याचे आवाहन केले आहे, जेणेकरून कोणतीही गैरसोय टाळता येईल. भुसावळ रेल्वे विभागाने कळवले आहे की, रेल्वे वाहतूक अधिक सुरळीत आणि वेळेवर व्हावी यासाठी हे बदल करण्यात आले आहेत.

## कर वसुली घोटाळाः 'तीन महिन्यांचा' तपास पुरेसा का?

# जुने व्यवहारही तपासण्याची मागणी

प्रतिनिधी ९ एप्रिल

**तेल्हारा :** नगर परिषदेत उघडकीस आलेल्या कर वसुली घोटाळ्याने अनेक प्रश्न निर्माण केले असून, केवळ मागील तीन महिन्यांतील व्यवहारांची चौकशी करून हा प्रकार थांबणार का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. ङ्कजर तीन महिन्यांत इतका मोठा गैरप्रकार झाला असेल, तर त्याआधीच्या कालावधीत काय झाले ?ङ्क असा प्रश्न आता जोर धरू लागला आहे.

नागरिकांचे म्हणणे आहे की, या प्रकरणाची चौकशी मर्यादित कालावधीत न ठेवता किमान मागील काही वर्षांतील कर वसुली व्यवहारांची तपासणी करावी. यामुळेच संपूर्ण घोटाळ्याचे खरे चित्र समोर येऊ शकते. दरम्यान, या प्रकरणात आणखी एक महत्त्वाचा मुद्दा पुढे आला आहे. शिपाई पदावरील कर्मचाऱ्यांना कर वसुलीचे अधिकार देणे योग्य आहे का? सामान्यतः आर्थिक व्यवहार, कर वसुली आणि पावती देण्याचे अधिकार हे प्रशिक्षित व जबाबदार अधिकाऱ्यांकडे असणे अपेक्षित असते. अशा संवेदनशील कामासाठी शिपायांची नियुक्ती करण्यात आली असल्यास, ती प्रक्रिया आणि निर्णय घेणाऱ्या अधिकाऱ्यांची भूमिकाही तपासण्याची गरज व्यक्त होत आहे. तज्ज्ञांच्या मते, शिपाईला थेट कर वसुलीचे अधिकृत अधिकार देणे ही नियमित प्रशासकीय पद्धत नाही. मात्र, विशेष मोहिमांमध्ये सहाय्यक म्हणून त्यांची नियुक्ती केली जाऊ शकते. परंतु, अशा वेळी योग्य देखरेख आणि नियंत्रण व्यवस्था असणे अत्यावश्यक असते.

या पार्श्वभूमीवर, ङ्कफक्त खालच्या स्तरावरील कर्मचाऱ्यांवर कारवाई न करता, निर्णय घेणाऱ्या आणि देखरेख करणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी,ङ्क अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. सध्या सुरू असलेल्या चौकशीमधून नेमका घोटाळ्याचा कालावधी, जबाबदार व्यक्ती आणि प्रणालीतील त्रुटी उघड होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. आता प्रशासन यावर किती व्यापक आणि पारदर्शक कारवाई करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK